


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक १६१ * नांदेड * मंगळवार, दि. १७ जून २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## महाराष्ट्र, कर्नाटक, गोव्यासह १६ राज्यांत मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)-** महाराष्ट्र, कर्नाटक, गोव्यासह मध्यप्रदेश-राजस्थान, बिहारसह १६ राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागाने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. पुढील ४८ तासांत अतिवृष्टीची शक्यता आहे. हा इशारा प्रामुख्याने कोकण प्रदेशाच्या काही भागांना लागू आहे, ज्यामध्ये रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. राज्याच्या बहुतेक भागात शनिवारी संध्याकाळपासून मोठ्या प्रमाणात पावसाची सुरुवात झाली आहे. मुंबई आणि आसपासच्या उपनगरांमध्ये पुढील दोन दिवसांत वादळासह मुसळधार ते अतिवृष्टी होईल. दरम्यान, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे, तर कोकणच्या इतर अनेक भागांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**दिल्लीच्या अनेक भागात पाऊस**

सोमवारी सकाळी दिल्लीच्या अनेक भागात पाऊस पडला, ज्यामुळे गेल्या काही दिवसांपासून दिल्लीत असलेल्या कडक उन्हापासून लोकांना दिलासा मिळाला. तथापि, दिवसाचे तापमान ४१.८ अंशांवर नोंदवले गेले. त्याच वेळी, केरळच्या अनेक भागात मुसळधार पाऊस सुरूच राहिला, ज्यामुळे झाडे उन्मळून पडली, नद्यांची पातळी वाढली आणि अनेक धरणांचे दरवाजे उघडावे लागले. दुसरीकडे, पावसाच्या रेड अलर्टच्या पार्श्वभूमीवर, सोमवारी मलप्पुरम, कन्नूर, कासरगोड, वायनाड आणि त्रिशूरमधील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. भारतीय हवामान खात्याने आज कर्नाटकात अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केला आहे, ज्यामुळे उडुपी आणि दक्षिण कन्नड जिल्हा प्रशासनाने सोमवारी सर्व शाळांमध्ये सुट्टी जाहीर केली आहे.

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात तुफान पाऊस**

गेल्या २४ तासांमध्ये सरासरी १०९ मिमी इतक्या पावसाची नोंद करण्यात आली आहे. परिणामी, जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. जिल्ह्यात सर्वाधिक पावसाची नोंद दोडामार्ग तालुक्यात झाली असून येथे तब्बल १४२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सावंतवाडी तालुक्यात १३२ मिमी, वेंगुर्ले १२९ मिमी, वैभववाडी १२२ मिमी, कुडाळ ११३ मिमी, मालवण १०५ मिमी, देवगड ९८ मिमी आणि कणकवली तालुक्यात ९५ मिमी पावसाची नोंद झाल्याचे हवामान विभागाने जाहीर केलं आहे. वेंगुर्ले बेळगाव राज्य महामार्गावरील होडावडे पूल पाण्याखाली गेला असून रात्रभर मुसळधार कोसळलेल्या पावसामुळे होडावडे पूल पाण्याखाली गेला आहे.

## एमएचटी सीईटी परीक्षेचा निकाल जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)-** महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांची प्रतीक्षा लागून असलेल्या एमएचटी सीईटी २०२५ (पीसीएम गट) चा निकाल सोमवारी अधिकृत वेबसाइट cetcell.mahacet.org वर जाहीर करण्यात आला आहे. या निकालामध्ये परीक्षेत बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण २२ विद्यार्थ्यांना १०० परसेंटाइल गुण प्राप्त झाले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (पीसीएम) गटातून परीक्षा दिली होती, त्या विद्यार्थ्यांसाठी हा निकाल आहे. तर, पीसीबी गट (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र) चा निकाल आज म्हणजेच १७ जून रोजी जाहीर केला जाईल. पीसीएम गटाची परीक्षा १९ एप्रिल ते ५ मे २०२५ पर्यंत आयोजित करण्यात आली होती. या गटात ४,६४,२६३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी ४,२२,८६३ उमेदवार परीक्षेला उपस्थित राहिले होते. त्यामध्ये, २२ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले आहेत.

## विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कार्यातून देशासह शाळेचे, गावाचे नाव उज्ज्वल करावे -पालकमंत्री अतुल सावे

- जिल्हा परिषद व सर्व शासकीय शाळांचे बळकटीकरण करणार
- पहिलीपासून सीबीएससी पॅटर्नच्या माध्यमातून आता शिक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)-** आज शाळेचा पहिला दिवस. प्रत्येक विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्यामध्ये उत्साह भरलेला असतो. या पहिल्या दिवशी मुलांचा उत्साह वाढावा म्हणून राज्य शासनाच्यावतीने विद्यार्थ्यांना गणवेश, बूट, वह्या तसेच इतर शालेय साहित्यांचे वाटप आज करण्यात आले आहे. यावेळी मुलांचा आनंद द्विगुणित व्हावा यासाठी पालकमंत्री अतुल सावे यांनी पालक, विद्यार्थी, शिक्षकांना शुभेच्छा संदेश दूरदृश्यप्रणालीद्वारे दिला. प्रत्येक विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणासोबतच उत्कृष्ट कार्यातून देशाचे, गावाचे, शाळेचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.



जिल्ह्यातील जिल्हा परिषदेसह सर्व शासकीय शाळा बळकटीकरण करण्यासाठी शासनाकडून जी काही मदत लागेल ती मदत करण्यात येईल, असे पालकमंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट केले. शाळेच्या पहिल्या दिवशी त्यांनी पालक, शिक्षकांचे आणि शाळेवर प्रेम करणाऱ्या सर्व नागरिकांचे स्वागत केले. पहिल्या दिवशी सर्वजण उत्साहात शाळेच्या कार्यक्रमात उपस्थित आहात. या पहिल्या दिवशी आपण सर्वांनी एक संकल्प करु या. या वर्षभरात आपण सर्वजण शाळेत उपस्थित राहू या. प्रत्येक नागरिक व विद्यार्थी शिकला पाहिजे अशा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. आपण सर्वांनी मिळून त्यांचा हा संकल्प पूर्ण करु या, असेही आवाहन त्यांनी केले.

आजपासून सर्व शाळांमध्ये सीबीएससी पॅटर्न राबविण्यात येणार आहे. या निर्णयानुसार सर्व जिल्हा परिषद शाळांमधून सीबीएससी पॅटर्न प्रमाणे शिक्षण मिळणार आहे. शासनाच्यावतीने सर्व शाळामध्ये डिजिटलायझेशन करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे असेही पालकमंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही लावले जात आहेत. शिक्षकांनी जे विद्यार्थी अभ्यासात मागे आहेत त्यांना इतर विद्यार्थ्यांसोबत आणण्यासाठी पालक आणि विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली पाहिजे. एखादा विद्यार्थी अभ्यासात मागे असेल तर त्याचे पालकांशी चर्चा करुन शिक्षकांनी संवाद साधला पाहिजे यामुळे त्या विद्यार्थ्यांच्या पुढील काळात चांगले काम होईल. आज विद्यार्थ्यांना गणवेश, बुट, वह्या, शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

## मावळातील कुंडमळा पुल दुर्घटनेतील ५२ जण बचावले

**पुणे (प्रतिनिधी)-** मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील जुना लोखंडी पूल रविवारी (१६ जून) दुपारी साडेतीनच्या सुमारास अचानक कोसळला. या दुर्घटनेत पुलावर उभे असलेले अनेक पर्यटक नदीत कोसळून वाहून गेले. सायंकाळपर्यंतच्या माहितीनुसार ४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ५२ जणांना सुखरूप वाचवण्यात यश आले. ५१जण जखमी झाले असून यातील ६ जणांची प्रकृती गंभीर आहे. अंधार झाल्यानंतर मदत व शोधकार्य थांबवण्यात आले.

## धाडसत्र सुरूच : नांदेड परिक्षेत्रात पंधरवड्यात पोलिसांच्या आणखी ९७३ कारवाया

### अडीच कोटींहून अधिक रक्कमेचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)-** दि. १ जूनपासून, नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान-२ सुरू करण्यात आले असून, जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पोलिसांनी १०५९ आरोपींविरुद्ध एकूण ९७३ कारवाया करून २ कोटी ६७ लाख ४६ हजार ५७१ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. अवैध व्यवसायांच्या विरोधात सुरू केलेली मोहीम आणखी तीव्र केली आहे.



परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाईन लॉटरी, क्रिकेट बेटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्या व्यवसाय, वाळू उपसा व वाहतूक अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दि. १ मेपासून नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी अभियान सुरू केले आहे.

पोलिसांनी, मे महिन्यात राबविलेल्या अवैध व्यवसायविरोधी अभियान-१ दरम्यान, अवैध व्यवसायांत गुंतलेल्या १७२१ इसमांविरुद्ध एकूण १५६१ केसेस करून ७ कोटी ७९ लाख ४७ हजार ४५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला होता. कारवाई दरम्यान, नांदेड येथील स्थानिक गुन्हे शाखेने लोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजाची वाहतूक करताना दोन इसमांना पकडून त्यांचे कडून एकूण १४ लाख १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. त्याचप्रमाणे, पोस्टे किल्लारी जि. लातूर यांनी १२ लाख ९८ हजार रुपयांचा गुटखा जप्त करून चांगली कामगिरी केली आहे. यात नांदेड पोलिसांनी २७ लाख ४५ हजार ७४७, परभणी ७१ लाख ९ हजार ५७८, हिंगोली पोलिसांनी ५४ लाख ९ हजार ४२२ तर लातूर पोलिसांनी एक कोटी चौदा लाख ८१ हजार ८२४ असा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कामगिरी बाबत, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

## इराणचा इस्रायलवर आजवरचा सर्वात मोठा हल्ला; ८ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** इराण आणि इस्रायलमधील संघर्ष चौथ्या दिवशीही सुरू आहे. सोमवारी इराणने सर्व परदेशी नागरिकांना देश सोडण्यास सांगितले आहे. इराण सरकारने सांगितले आहे की जमीनी सीमा उघडण्यात आल्या आहेत. इराणमध्ये सुमारे १० हजार भारतीय नागरिक अडकले आहेत. इस्रायलशी झालेल्या संघर्षामुळे देशातील सर्व विमानतळ बंद आहेत.

इस्रायलने इराणमध्ये केलेल्या हल्ल्यांदरम्यान, भारतीय दूतावास विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी काम करत आहे. याशिवाय, इतर अनेक मार्गांचाही शोध घेतला जात आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने एक प्रेस रिलीज जारी करून ही माहिती दिली आहे. इराणमध्ये सुमारे १० हजार भारतीय आहेत, ज्यांपैकी मोठी संख्या विद्यार्थी आहे. दरम्यान, सोमवारी सकाळी इराणने इस्रायलवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला.

## मी जिल्हा परिषदेच्या शाळेतचाच विद्यार्थी -जिल्हाधिकारी कर्डिले




**नांदेड (प्रतिनिधी)-** जिल्हा परिषद शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच मैदानी खेळ शिकवले गेले पाहिजे. जे-जे मुलांना आवडते ते खेळ शाळेत घेतले जावे, मी ही जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकलो आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

संपूर्ण जिल्ह्यात सुट्टी संपून शाळा चालू झाली. यावर्षी महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासनाच्यावतीने इयत्ता पहिलीत दाखल होत असलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागतासाठी एका अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या शाळा प्रवेशोत्सवानिमित्त जिल्ह्याधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा वाजेगाव येथिल पहिली प्रवेश पात्र विध्यार्थ्यांना आपल्या हस्ते प्रवेश दिला. यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना कर्डिले म्हणाले, जिल्हा परिषद वाजेगाव शाळेने शाळा प्रवेशोत्सव अतिशय सुंदर पध्दतीने आयोजन करताना लोकप्रतिनिधी, पत्रकार, पालक यांचा सहभाग घेतला. याबदल मी या विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी व्यंकटेश चौधरी, केंद्रप्रमुख व्यंकट गंदपवाड, मुख्याध्यापिक फरहत बानो सर्व, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती यांचे अभिनंदन करतो.

यावेळी जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी माझा शाळेचा पहिला दिवस या नावाची घडीपत्रिका जिल्हाभरातील पात्र विद्यार्थी हे स्वतः हस्तक्षरात भरतील व ते इयत्ता दहावी पूर्ण म्हणजे २०३५ ला उघडून पाहतील. तेव्हा त्यांचे हस्तक्षर, आपले नोंदवलेले मनोगत वाचून एक वेगळा आनंद त्यांना होईल. तत्कालीन शाळा मुख्याध्यापक, शिक्षक यांची आठवण होईल. हेच विद्यार्थी आपल्या उजव्या हाताचा ठसा शाळेतील मोठ्या भित्तिपत्रकावर घेऊन शिक्षक दर्शनी भागावर लावतील जेणे करून विद्यार्थी त्या ठशांना पाहून आनंदी होतील व मनात शिक्षणाची आवड निर्माण होईल, अशी संकल्पना त्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर यांनी म्हणाले, शाळेच्या मुख्याध्यापिका प्रभारी महिला असून अतिशय सक्षमपणे त्या शाळा चालवताना दिसून येत आहे. या शाळा प्रवेशोत्सवाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख व्यंकट गंदपवाड यांनी केले. तर सूत्रसंचालन सीमा देवरे यांनी केले तर आभार मुख्याध्यापिका फरहत बानो यांनी मानले. याप्रसंगी गावचे सरपंच शेख जमील, शाळा व्यस्थापन समिती अध्यक्ष शेख ताहेरा बेगम जलाल, शमीम सुलताना, मोहमद शकील, मोहम्मद कफिल, भगवान गजभारे, अनिल कोकरे, सामाजिक कार्यकर्ते अब्दुल रहेमान, सय्यद मुसा, बाळासाहेब सूर्यवंशी, यशवंत हटकर, पत्रकार लतीफ पठाण, सय्यद समदानी यासह मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

## अल्पवयीन बालिकेचा विनयभंग; डॉक्टर्ससह तिघांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहराच्या शिवनगर भागात राहणाऱ्या एका तेरा वर्षीय बालिकेचा ओळखीच्या डॉक्टराकडून विनयभंग झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध विनयभंग, पोक्सो आणि अॅट्रॉसिटी अॅक्टअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडीता मुळची उमरखेड तालुक्यातील राहणारी आहे. ती आपल्या कुटुंबियांसह शहराच्या शिवनगर भागात किरायाने राहते. याच परिसरामध्ये डॉ. महेश जाधव, पुंजाराम जाधव आणि एक महिला यांची पीडित मुलीसोबत ओळख झाली आणि यातूनच पुढे डॉक्टर महेश जाधव हा तिचा विनयभंग करत असे. हा प्रकार २४ मे २०२५ ते ८ जून २०२५ दरम्यान सतत घडला. घडलेला प्रकार पीडित बालिकेने आपल्या आईला सांगितला. या प्रकरणाचा जाब विचारण्यासाठी पीडित बालिकेची आई त्यांच्या घरी गेली असता तिलाही जातीवाचक शिवीगाळ करत तुझ्याने काय होते ते कर अशी धमकी दिली. पीडित बालिकेच्या आईने विमानतळ पोलीस ठाण्यात जाऊन फिर्यादी दिली. तिच्या फिर्यादीवरून आरोपी डॉ. महेश जाधव, पुंजाराम जाधव आणि एका महिलेविरुद्ध विनयभंग, पोक्सो आणि अॅट्रॉसिटी अॅक्टअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक करत आहेत.

## अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्ष पदावरून बच्चू कडू यांना ठरवलं अपात्र

**अमरावती (प्रतिनिधी)-** अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्ष पदावरून बच्चू कडू यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. विभागीय सहनिबंधक यांनी हा निर्णय घेत बच्चू कडू यांना मोठा धक्का दिला आहे. न्यायालयाच्या एक वर्षाच्या शिक्षेचा ठपका ठवेत बच्चू कडू यांच्याबाबत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.




बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड यांच्यासह ११ संचालकांनी बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांना बँकेच्या संचालक पदावरून अपात्र करण्याबाबतची याचिका दाखल केली होती. नाशिक न्यायालयाने बच्चू कडू यांना एका प्रकरणात एका वर्षाची शिक्षा ठोठावली असल्याचा दाखला त्यांनी यामध्ये दिला. याचा आधार घेत विभागीय सहनिबंधक यांनी आपणास अपात्र का करण्यात येऊ नये, तसेच पुढील पाच वर्षाकरीता आपणास सदरचे पद धारण करण्यास अपात्र का करू नये? अशी नोटीस बच्चू कडू यांना बजावण्यात आली होती. २४ फेब्रुवारीला दुपारी ३ वाजता साक्ष नोंदविण्याकरिता समक्ष अथवा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे, असे नोटिसीत नमूद करण्यात आले होते. अशातच आता विभागीय सहनिबंधक यांनी हा निर्णय घेत बच्चू कडू यांना मोठा दणका दिलं आहे.

दरम्यान, २०१७ साली नाशिकच्या सरकारवाडी पोलीस ठाण्यात बच्चू कडू यांच्यावर शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी आणि मारहाण केल्या प्रकरणी गुन्हे दाखल आहेत. नाशिकच्या विशेष न्यायालयाने २०२१ साली बच्चू कडू यांना एक वर्षापर्यंत कठोर कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

## शाळेच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यात रंगला गुलाबपुष्प स्वागताचा उपक्रम

### लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला स्नेहबंध







**नांदेड (प्रतिनिधी)-** जिल्हा परिषदेच्या शालेय शिक्षण विभागाच्या १०० शाळांना भेट उपक्रमांतर्गत सोमवारी जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाचा उत्साहात प्रारंभ झाला. यावेळी लोकप्रतिनिधी, वरिष्ठ प्रशासनातील अधिकारी, शिक्षक व पालक यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन, तर नवागत पहिलीतील विद्यार्थ्यांना फुले, पुस्तके, पेन्सिल तसेच स्मरणघडी पत्रिका देऊन स्वागत करण्यात आले.

खासदार अशोक चव्हाण यांनी भोकर येथील नूतन कन्या शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी माहूर येथील केंद्रीय प्राथमिक शाळेस भेट देवून विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप केले. त्यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली. आमदार तथा बाळासाहेब ठाकरे हळद-हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील यांनी नांदेड तालुक्यातील पासदगाव शाळेला भेट दिली. आमदार प्रतापराव चिखलीकर यांनी लोहा तालुक्यातील सोनखेड जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार रोजश पवार यांनी घुगराळा येथील जिल्हा परिषद शाळेत, तर आमदार श्रीजया चव्हाण यांनी मुगट येथील शाळेत चिमुकल्यांशी हितगुज केले. आमदार आनंदराव तिडके बोंढारकर यांनी जवाहरनगर तुप्पा येथील शाळेला भेट दिली. आमदार बाबुराव कोळीकर यांनी हदगाव तालुक्यातील कोहळी व निवघा येथील शाळांना भेटी दिल्या. खासदार डॉ. अजित गोपछडे यांचे बंधु बिलोली पंचायत समितीचे माजी सभापती उमाकांत गोपछडे यांनी बिलोली तालुक्यातील लोहगाव येथील शाळेस तर आमदार बालाजी कल्याणकर यांच्या सुविद्यपत्नी संध्याताई कल्याणकर यांनी निळा येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी वाजेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी हदगाव तालुक्यातील तामसा येथील शाळेत, जिल्हा पोलीस अधीक्षक अभिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी वसरणी येथील जिल्हा परिषद शाळेत जाऊन नवागतांचे स्वागत केले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच जिल्ह्यातील २२० शाळांना वर्ग १ व २ संवर्गातील अधिकाऱ्यांनी भेटी देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले व शाळेतील सुविधांची पाहणी कली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, शिक्षणाधिकारी नियोजन दिलीपकुमार बनसोडे, उपशिक्षणाध्किारी नागराज बनसोडे, अवधूत गंजेवार यांच्यासह शिक्षण विभागतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यासाठी पुढाकार घेतला.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# कृत्रिम बुद्धिमत्ता: चमत्कार की चेतावणी?

जग झपाट्याने बदलत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवी जीवन अधिक सुलभ आणि गतिमान बनले आहे. या प्रगतीचा सर्वोच्च बिंदू म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'एआय'. एकेकाळी फक्त विज्ञानकथांमध्ये ऐकू येणारी ही संकल्पना आज आपल्या दैनंदिन आयुष्याचा अविभाज्य भाग बनली आहे. पण जिथे तंत्रज्ञानाच्या मदतीने अनेक गोष्टी शक्य होऊ लागल्या आहेत, तिथेच या तंत्रज्ञानाच्या अतिरेकामुळे भविष्यात मानवी अस्तित्त्वालाच धोका निर्माण होण्याची शक्यता आता गंभीरपणे चर्चेत येऊ लागली आहे. आज मनोरंजन, वैद्यकीय सेवा, शेअर बाजार, शिक्षण, कायदा, सुरक्षा आणि अगदी पत्रकारितेपर्यंत प्रत्येक क्षेत्रात एआयचा प्रभाव दिसून येतो. २०२२ मध्ये 'चॅट जीपीटी' आणि तत्सम इतर एआय प्लॅटफॉर्म्स आल्यापासून ही क्रांती अधिक वेगाने घडू लागली आहे. कामं झपाट्याने पूर्ण होतात, निर्णय प्रक्रिया गतिमान होते, आणि खर्चातही बचत होते. या कारणांमुळे अनेक कंपन्या आणि संस्था एआयच्या वापरात आघाडी घेत आहेत. मात्र, याच एआयमुळे उद्भवणाऱ्या समस्यांचा अंदाज घेत जगभरातील तज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ आता सावधगिरीचा इशारा देऊ लागले आहेत. अमेरिकेतील ओक्लाहोमा स्टेट युनिव्हर्सिटीने दिलेला इशारा धक्कादायक आणि विचार करायला लावणारा आहे. त्यांच्यामते, एआयचा अतिरेक मानवी हस्तक्षेपाशिवाय निर्णय घेणाऱ्या प्रणालींच्या निर्मितीकडे झुकत आहे. भविष्यात हीच प्रणाली इतकी स्वयंपूर्ण होऊ शकते की, माणसांच्या गरजा संपतील, आणि परिणामी लोकसंख्याही झपाट्याने घटू लागेल. यांच्या मते, २३०० पर्यंत पृथ्वीवरील लोकसंख्या आजच्या ८ अब्जांवरून केवळ १० कोटींपर्यंत खाली येऊ शकते. त्यांच्या या विधानाला बळ देणारे अनेक संकेत आजच दिसून येत आहेत. युरोप, जपान, कोरिया आणि चीनसारख्या देशांत जन्मदर घसरत चालला आहे. एलॉन मस्कसारख्या जागतिक उद्योगपतींनीही ही बाब गंभीरतेने मांडली आहे. वाढती बेरोजगारी, आर्थिक अस्थिरता, आणि आयुष्यातील असुरक्षितता यामुळे लोक विवाह आणि पालकत्वाकडे पाठ फिरवू लागले आहेत. कामगारांची गरज कमी झाली की, कंपन्या नोकऱ्या कमी करतात. शिक्षण, कायदा, वैद्यकीय सल्ला या क्षेत्रांत एआयवर आधारित सेवा उपलब्ध होऊ लागल्या आहेत. त्यामुळे या क्षेत्रांतील नोकऱ्यांनाही धोका निर्माण झाला आहे. भारतीय युवकांसाठी हे विशेष चिंतेचे कारण आहे. कारण, आपल्याकडे तरुण लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे आणि नोकरीच्या संधी हाच त्यांचा मुख्य आधार आहे. मार्च २०२५ मध्ये ब्रिटनच्या चान्सेलर रॅचेल रीव्हस यांनीही सांगितले होते की, एआयमुळे अनेक भूमिका नष्ट होत आहेत. त्याचवेळी, एआयशी संबंधित कौशल्यांची मागणी मात्र झपाट्याने वाढते आहे. एका सर्वेक्षणात नमूद झाले आहे की, ८७ टक्के भरती व्यवस्थापक एआय-प्रवीण उमेदवार शोधत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात ज्यांच्याकडे या कौशल्यांचा अभाव आहे, ते मागे पडणार हे स्पष्ट आहे. अशा पार्श्व-भूमीवर भारतासारख्या देशांनी वेळेवर सावध होणे गरजेचे आहे. केवळ एआयची स्तुती न करता त्याचे धोके ओळखणे, त्यावर नियंत्रण ठेवणारे कायदे बनवणे आणि लोकशिक्षणासाठी धोरण आखणे, या गोष्टी आता अत्यावश्यक आहेत. शाळांपासून ते विद्यापीठांपर्यंत विद्यार्थ्यांना केवळ एआय वापरण्याचेच नव्हे तर त्याचे सामाजिक आणि नैतिक परिणाम समजून घेण्याचे शिक्षण देणे हाही धोरणाचा भाग असावा. कृत्रिम बुद्धिमत्ता ही अद्भूत शक्यतांनी भरलेली संकल्पना आहे. मात्र, तिच्या अंधश्रद्धापूर्ण स्वीकाराऐवजी समजूतदार वापर हाच आपल्या भविष्यासाठी आवश्यक आहे. माणूस, त्याचे अस्तित्त्व आणि समाजव्यवस्था याला धोका पोहोचवणारे कोणतेही तंत्रज्ञान कितीही प्रगत असले तरी त्यावर नियंत्रण ठेवणे हाच खरी प्रगतीचा मार्ग आहे.

# तारुण्य एक प्रवाही अवस्था



आठवी, नववीच्या वर्गात शिकत असेल. साने गुरुजींचे एखादे जीर्ण झालेले पुस्तक जरी हाती लागले तरी त्यावर अधाशासारखे तुटून पडून कधी एकदा हे पूर्ण करतो, असे होऊन जायचे. गुरुजींचे साहित्य हे भावनाशील वाचकांचा प्राण होता. एकदा का त्यात वाचक तन्मय झाला की, त्याला सर्व जगाचा विसर पडायचा. एका वेगळ्या भावविश्वात तन्मय होण्याचा आनंद त्याला मिळायचा. तो आनंद शब्दातीत होता. तो एका वेगळ्याच भावविश्वाशी तादात्म पावण्याचा एक उच्च दर्जाचा संस्कारी अनुभव होता. त्या एकाग्र विश्वातून आरडाओरड करुन बाहेर आणण्याचा प्रयत्नं कोणीही केला असेल तर तो दुष्टपणा असह्य व्हायचा. ती व्यक्ती कितीही जवळची आणि मोठी असली तरी ती शत्रू क्र. एक वाटायची. मनोमन सात्विक संताप येऊन जायचा. शक्यतोवर जोरात आवाज देऊन त्या विश्वातून बाहेरच्या व्यावहारिक जगात आणण्याचे महान कार्य आई-वडीलच करायचे. मग एक नामी युक्ती मला सुचायची, पण ती फक्त आईसमोरच चालायची. वडिलासमोर चालवण्याची हिम्मत कुणी करावी? ती युक्ती अशी, आई हे पुस्तक एकदम मस्त आहे, मी तुला वाचून दाखवतो. तू काम करता करता ऐक, तू जर ऐकले तर मी तुला तुझ्या कामात मदत करेन. ती तयार व्हायची, म्हणायची, किती चांगले विचार आहेत रे वसंता, हे सगळं काही ऐकण्यासारखच हाये नं बाप्पा. असं काही असलं की मले आठवण करुन ऐकवजो. म्हणजे माह्या डोस्क्यात जरा कसा उजेड पडलं. ती अशी म्हणाली की माझा उत्साह वाढायचा.माझी अशी आगळी वेगळी पोथी वाचणं सुरु झालं की शेजारच्या दोन चार मावशी, आत्या, काकू, आजी जमायच्या, ही वसंताची पोथी हाये पण लय अल्लगच हाये, पण चांगली हाये. आमचा मुडदा तं कधी एक शब्द वाचुन दाखवतं नाही.काय शिकतय आन् काय नाही कोन्हालं माहितं. असा त्या निष्पाप मुलांवर लगेच अविश्वासाचा ठरावं यायचा आणि माझ्यासाठी कौतुकाचे उमाळ्यावर उमाळे. ही मायमावल्यांच्या मतातील विसंगती माझ्यासाठी खूप सुखाऊन जाणारी होती.

एकदा साने गुरुजींची 'देवाघरच्या फुलांनो' एक छोटीशी पुस्तिका आई-समोर वाचत होतो. त्यातील एक गोष्ट अशी, एकदा एका लहान मुलाकडून एक संगीत शिक्षक तबला वादनाचा सराव करुन घेत होते. त्याचा अपेक्षित सराव होईपर्यन्त गुरुजींचा सराव सुरुच होता.सहाजिकच काही वेळाने तो मुलगा कंटाळला आणि उत्स्फुर्त पणे बोलून गेला, अहो गुरुजी काय त्रास आहे हा. अजून किती वेळ हे सगळे सुरु राहणार आहे.माझी बोटे खूप दुखत आहेत हो. त्यावर गुरुजी हसत म्हणाले, अरे बाळा कंटाळा करु नकोस,सरावामुळे तुझी बोटे खूप बळकट होतीलं. दु:ख, त्रास, यातना, कष्ट, श्रम यामुळे शारीरिक आणि मानसिक क्षमता वाढते.जेंव्हा खूप श्रम केल्यावर अंगातून घाम निथळेल, तेंव्हा आपल्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद कुबेरापेक्षाही जास्त असेलं. रक्ताभिसरण, हृदयस्पंदने, मेंदूची सक्रीयता मोठ्या प्रमाणात वाढलेली असेलं.

युवापिढी सक्षम होण्यासाठी युवकांनी कठोर परिश्रम करण्याची गरज आहे. गुरुजींच्या समर्पक उत्तराने त्या विद्यार्थ्याचे समाधान झाले.कठोर परिश्रमाला पर्याय नाही.हे त्याच्या ध्यानी आले.जे ध्यानी आले ते त्याने मनोमनी जाणले.दु:खाशिवाय बळ नाही. श्रमाशिवाय सामर्थ्य नाही. महापुरुषांच्या जीवनात किती कठोर परिश्रम होते? दु:ख, यातनानी भरलेल्या त्या प्रवासात त्यांना सर्व प्रकारचे बळ कुणी दिले? दगडातील अनावश्यक भाग बाजूला करण्यासाठी त्या दगडाला असंख्य घाव सहन करावे लागतात. मूर्ती त्यानंतर तयार होते.पुढे मंदिरात तिची स्थापना केली जाते.दर्शनास भक्त रांगेत उभे राहतात. लवकर दर्शन व्हावे यासाठी वेगवेगळ्या क्लुप्त्या केल्या जातात. केवळ दगडाचा अनावश्यक भाग काढून टाकला आहे आणि जो रेखिव कोरीव भाग आहे तो शिल्लक आहे. त्याच्या समोर नतमस्तक होण्यासाठी माणसं एवढं जीवाचं रान करतात. किती तरी अंतर पार करुन, पैसा खर्च करुन, जीव धोक्यात घालून, प्रसंगी चेंगराचेंगरीत जीव देऊन, अतिरेकी, नक्षलवादी यांचे लक्ष बनून देवदर्शन त्यांना महत्वाचे वाटते. हे अहोभाग्य त्या मूर्तीच्या वाट्याला का आले तर टाक्याचे घाव सहन करुन तिने विशेष स्थान प्राप्त केले. तसे कठोर परिश्रम करुन विशेषत्व प्राप्त केलेल्या व्यक्तीच्या मागे लोक धाव घेतात.तपश्चर्येने तेज प्राप्त होते आणि अति सुखसोयी आणि विश्रांतीने आजार प्राप्त होतात. तिन्ही ऋतुत कोणत्याही प्रतिकुल परिस्थितीला न घाबरता जे श्रमिक राबत राहतात. तलावात उभे राहुन दिमाखात मिरवणारे कमळ चिखलात उभे असते. एकदा हिमालयाच्या कुशीतून निघालेले दोन प्रवाह खळाळत निघाले.एक प्रवाह म्हणाला, आता कुठपर्यंत धावत निघायचे? या डोंगराजवळ मी थांबलो तरी माझा उपयोग होणार आहेच. जेंव्हा लोक जंगलात येतील. प्राणी, पक्षी येतील त्यांची तहान भागविण्याचे काम मी करणारच आहे.


सत्कार्य काय एका ठिकाणी राहुनही करता येईलं.इथेच थांबल्या-मुळे माझ्या आजूबाजूला अनेक सुविधा होतील. एक पर्यटनस्थळ म्हणून मला लोक भेट देतील. अनेक लोक माझा उपयोग घेतीलं. मी अनेकांच्या वाट्याला येईलं.एका जाग्यावर थांबुनही मला आनंदाचा स्वामी होता येईल. त्या प्रवाहाचा विचार पक्का झाला. तो तिथेच कायमस्वरूपी थांबला. दुसरा प्रवाह मात्र खळाळत, हसत, बागडत पुढे पुढे निघाला. त्याला मागे पहाण्यासाठी उसंत होती कुठे? 'पुढे चला रे पुढे चला' हे गितगायन त्याच्या जीवनात सदैव सुरुच होते. त्या प्रवाहाचे पुढे नदीत रुपांतर होऊ लागले. त्याच्या आजूबाजूने असणारी दाट झाडी, गवताची कुरणे, पशु, पक्षी, प्रत्येक गावातील लोक त्या नदीच्या पाण्याचा भरभरुन उपयोग घेत होते.जलमातेचा दर्जाचं तिला प्राप्त झाला होता. अनेक छोटे प्रवाह तिच्या कुशित येत होते. जलमाता अनेकांना आपल्या कुशीत सामाऊन घेत होती.आणखी पुढे पुढे गेल्यावर मला माझी लेकरे भेटणार आहेत. ती माणसे असतील, पशुपक्षी, जलचर प्राणी तर नेहमीच माझ्या कुशीत असतीलं. त्यांना तृप्त करण्याची, सामाऊन घेण्याची क्षमता मी ईश्वराकडे मागणार आहे. त्यातच माझा परमोच्च आनंद आहे. विश्रांती, आराम प्रवाही नदीला मान्य नाही. विश्रांतीमुळे आपल्यात साचलेपणा येईलं. आपले डबके होईलं. याची किती उत्तम काळजी घेत होती ती जलमाता!

आता तिच्या प्रवाह तिरावर मोठे वृक्षही आहेत. हिरवीगार शेते, शेतात राबणारे शेतकरी कष्टकरी, सर्व काही आनंदमय वातावरण. मासे, कासव, आणखी छोटे, छोटे जलचर प्राणी. या पाण्याचा उपयोग नवनवीन उद्योग, व्यवसायासाठी होतं होता. ती नदी पुढेच जात आहे.आता तर तिला सागर मिलनाची उत्कंठा लागली होती. समुद्र मार्गातील येजा आता त्या नदीतून सुरु झाली होती. किती भाग्य त्या खळखळून वाहणाऱ्या प्रवाहाचे. जो दुसरा प्रवाह एकाच ठिकाणी जंगलाच्या बाजुने थांबला होता. त्या साचलेल्या पाण्यापर्यंत एक वाटसरू वाट चुकून तिथे पोहचला.तो खूप तहानलेला होता. पाणी पिण्यासाठी तो पाण्याजवळ जाऊन थांबला. त्याने हाताची ओंजळ केली तर त्याच्या हाती नुसते शेवाळ आले.फक्त एका वाटसरुची तहान भागविण्याचे काम ते साचलेले डबके करु शकले नाही. मनुष्यजीवन हे पाण्यासारखे प्रवाही असावे. त्याने अनेकांच्या वाट्याला यावे.त्यातही मनुष्य जीवनातील युवावस्था खळाळून वाहणाऱ्या त्या प्रवाहासारखीच असते . उसळते साहस घेऊन युवा वायू वेगाने निघाला पाहिजे. सदोदित प्रसन्न, नवचैतन्य घेऊन जगणारा. आजन्म साधना करणारा, शिकत राहणारा, सतत नाविन्याचा ध्यास घेणारा, सतत दातृत्वाची भावना ठेवणारा, वरिष्ठांचा सन्मान ठेवून समर्पित जीवन जगणारा, अशाप्रकारे सर्व सद्गुण अंगी बाळगत गेलात तर इतरांना सुखाची पखरण करीत जी नदी सागरास मिळाली. त्याप्रमाणे युवकांची तरुणाई मानवतेला आपल्या वर्तनाने आनंदी करू शकेलं. स्वत:लाही एका सकारात्मक कार्याचा आनंद मिळऊन घेणे शक्य होईलं.समाज व राष्ट्राची सक्षम मानवी संपत्ती होण्याचे भाग्य पदरी पडेल आणि शेवटी सत्कार्य सागरास जाऊन मिळाले की आपल्या मानवी जीवनाचे सार्थक झालेच म्हणून समजावे.त्यामुळेच त्या एकलकोंड्या प्रवाहाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवू नका. ते जगणे म्हणजे मरणयातनाच होय. प्रवाही माणसाचे मरण हे अनेक अर्थाने जगणे असते. आपले जगणे हे कधीही मरण यातना होणार नाहीत याचा विचार जर युवावस्थेत करता आला तर शेवटपर्यंत वृद्धत्वाचा स्पर्श होणार नाही. आपल्यातील मनुष्यत्व प्रगल्भ झाल्यावर कोणत्याही दु:खाचा त्रास होणार नाही.

माझ्या अशा वाचन उपक्रमा-मुळे आई खूप आनंदी व्हायची.तीला शिक्षणाचा गंध नसला तरी आपण नविन काही ऐकले आणि ते माझ्या मुलाने मला वाचुन दाखवले याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर मला भरभरुन दिसायचा.पुढे माझ्या नोकरीच्या गावी आई माझ्या सोबतच असायची आणि चांगल काही वाचून दाखव हा तिचा हट्ट शेवट पर्यंत कायम होता. तिचा हट्ट पूर्ण करण्यात मलाही खूप आनंद मिळायचा. ते माझे परम भाग्य होते.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# ठेव जपून आत ओलावा प्रेमाचा...



सध्याचे दिवस हे यंत्रयुगाचे आहेत...यंत्राविना माणसाचे जगणे असह्य झाले असताना सगळीकडे मात्र माया कोरडी होतानाचे चित्र दिसून येते. मात्र माणुसकीचा आपलेपणा कायम टिकवून ठेवता यायला हवा.कारण सभोवतालच्या घडणाऱ्या विचित्र गोष्टींचा विचार केल्यावर आपल्याला माणसा-माणसातील प्रेमाच्या संबंधाची विहीर विखाराच्या उन्हाने कोरडी पडत चालल्याचे अनेक पुरावे सापडतात.

आजूबाजूला घडणाऱ्या अतिशय टोकाच्या हिंसक घटना पाहता, आपल्याला आपल्यातील प्रेमाची भावना दिवसेंदिवस आटत चालली आहे का, ही शंका येत असून, ती शंका अगदी रास्त ठरत असल्याचे आपणाला पाहायला मिळत आहे.. आधुनिकतेच्या, जागतिकीकरणाच्या, प्रभावाखाली येऊन प्रचंड मोठ्या प्रमाणात आपण आपल्या मूल्यांचा ऱ्हास करत सुटलो आहोत.. यावर आपणाला वेळीच आळा घालता नाही आला, तर एक दिवस मनुष्य जमात एका विचित्र वळणावर येऊन, स्वतच्या हातानेच आपला शेवट करून घेते की काय अशी शंकेची पाल मनात घर करत आहे.

सर्व संत, ग्रंथ आणि विचारवंत यांच्या शिकवणीचे मध्यवर्ती तत्त्व म्हणजे केवळ प्रेम राहिलेले असून, त्यात कुठेही हिंसेला तिळमात्र थारा नाही..मग आपण त्यांनी दाखवलेल्या प्रेमाच्या मार्गावरून वाटचाल न करता, हाती हिंसेचा हात घेऊन विविध हिंसक रूपाने समाजात विखार पसरवत असल्याचे दिसत आहे..

प्रेम या अडीच अक्षरी शब्दात
जी ताकत आहे, ती हिंसा किंवा आणखी कुठल्याच हिंसक गोष्टीत नाही, याचे आपल्याला आत्मभान व्हायला हवे, तरच आपण आज वाढत असलेले विखाराचे ऊन्ह त्यावर प्रेमाची सावली पांघरून त्याला कमी करू शकतो.. आणि ही प्रेमाची सावलीच आपणाला एका सुंदर आणि आनंदी विश्वात घेऊन जायला मदत करेल.

नकोस सोडू हात,
हातून कधीच प्रेमाचा,
प्रेमच देईल अनुभव तुला,
खऱ्या आनंदी जीवनाचा
वरील ओळींमध्ये म्हटल्याप्रमाणे,

जर आपण नेहमी आपल्या हातात प्रेमाचा हात धरून जगण्याच्या मार्गावरून चालत गेलो, तर हा प्रेमाचा हात आपणाला नितळ,निर्मळ आनंद देईल व आपल्या जगण्याची बाग अधिकच आकर्षक व सुंदर होईल.

आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या अफाट विचित्र गोष्टी आपले मन सुन्न करून जातात, वर्तमानपत्राच्या पानापानावरच्या, टीव्हीवरील प्रत्येक चैनलवरील जीव घेण्या बातम्या वाचून आणि पाहून आपण संतांनी शिकवलेल्या प्रेमाच्या मार्गावर चालत आहोत का? हा प्रश्न पडतो आहे..

बदल हा जरी काळाचा नियम असला, तरी आधुनिकतेच्या नावावर आपल्याकडून होत असलेली पारंपरिक मूल्यांची कत्तल एका विचित्र वळणाकडे आपल्याला घेऊन जात आहे.

परिणामी माणसाच्या हृदयातील प्रेमाचा पाझर कमी होऊन त्याची जागा विखारी उन्हाने घेतली असून या उन्हाने आपण दिवसागणिक होरपळून निघत आहोत..केवळ प्रेम, दया, करुणा आणि शांतता हीच शस्त्र, इतर कुठल्याही शस्त्रापेक्षा आपणाला जगण्याच्या युद्ध-भूमीवर आपल्या डोक्यावर विजयाचा मुकुट धारण करायला मदत करतील यात कुठलीच शंका नाही...

ठेव जपून तू ओलावा प्रेमाचा,
खोल खोल आत तुझ्या,
नक्कीच येईल मदतीला कुठल्याही,
संकटात ओलावा प्रेमाचा तुझ्या..

म्हणून आपल्यातील आटत चाललेला प्रेमाचा ओलावा आपणालाच टिकवून ठेवावा लागेल, कारण या रखरखत्या विखराच्या उन्हात आपणाला तो रामबाण उपाय म्हणून कामाला पडणार असून...माणूस म्हणून आपल्या आतील हा प्रेमाचा ओलावा आपल्याला सतत या विखारी उन्हाशी दोन हात करण्यासाठी प्रचंड मोठ बळ देईल..

**-प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोहीपिंपळगाव,
ता. मुदखेड, जि. नांदेड
मो. ९७६७८५१०४६

# द. आफ्रिकेचा लॉर्डसवर टेंभा

प्रचंड उत्सुकता लागलेल्या क्रिकेट कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत द.आफ्रिका संघाने बलाढ्य ऑसी संघाला खडे चारत पहिल्यांदाच विजेतेपद पटकावले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत एडन मार्करम आणि टेंबा बवुमाने कांगारूंचा प्रतिकार करत लॉर्डसवर विजयाचा टेंभा मिरवला आहे. आयसीसी स्पर्धेत सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या द.आफ्रिकेला यश वारंवार हुलकावणी देत होते. मात्र यावेळी त्यांचे नशीब फळफळले आणि तब्बल २७ वर्षानंतर त्यांचा आयसीसी चषकाचा दुष्काळ संपुष्टात आला आहे.

झाले काय तर द. आफ्रिका, वेस्ट इंडीज आणि न्यूझीलंड हे तीन संघ कायम अस्सल क्रिकेट रसिकांच्या गुड बुक्स मध्ये आहेत. यापैकी वेस्ट इंडीज आणि किवी संघाने आयसीसी चषकाला गवसणी घातली आहे परंतु प्रोटीयाज संघ नेहमीच मोक्याच्या वेळी गळपटत होता आणि हातातोंडाशी आलेला विजय गमावत होता. यामुळेच की काय त्यांना चोकर्स चा टॅग लागला होता. मात्र यावेळी परिस्थिती बदलली होती, टेंबा बवुमाच्या नेतृत्वात या संघाने इतिहास रचत चोकर्सचा डाग पुसून काढला आहे. चौथ्या डावात यशस्वी पाठलाग करताना त्यांनी स्टार्क, हेझलवूड आणि पॅट कमीन्सला भीक न घालता पक्का निर्धार करत अजिंक्यपद प्राप्त केले आहे.

दोन्ही संघांचा विचार केला तर निश्चितच कांगारूंचे पारडे जड होते, त्यातही अंतिम सामना म्हटला की कांगारूंचे बळ दुप्पट होते. फायनलला त्यांचे किलर




इंस्टिक्ट कमाल पातळीवर असते. त्याविरूद्ध द.आफ्रिकेचा संघ एकदम सज्जन आणि सोज्वळ. तरीपण शेवटी क्रिकेट म्हटले की बस समझ लिए असे नसते आणि हेच या सामन्यात घडले. पहिल्याच दिवशी ऑसी संघ दोनशेत गुंडाळून आफ्रिकन संघाने चढाई जिंकली होती. पण कांगारूंनी जबरदस्त प्रतिहल्ला करत आफ्रिकेला १३८ धावांत गारद केले. तर ऑसींच्या दुसऱ्या डावात पुन्हा एकदा रबाडा ॲंड कंपनीने ऑसींचा कबाडा करत त्यांना २०७ धावांवर रोखले.

पहिल्यावहिल्या कसोटी जेते-पदासाठी आफ्रिका संघाला चौथ्या डावात चांगली कामगिरी करणे गरजेचे होते आणि त्यांच्याकडे मार्करम हा हुकमाचा एक्का होता परंतु पहिल्या डावात त्याने भोपळा न फोडल्याने चिंता वाढली होती. मात्र मार्करमने संघाचा विश्वास सार्थ ठरवला. त्याने मुल्डर, बवुमा, स्टब्स आणि बेडींघम सोबत अनुक्रमे ६१, १४७, २४ आणि ३५ धावांच्या चार महत्त्वपूर्ण भागीदारी रचल्या आणि आपल्या संघाला आयसीसी चषक मिळवून दिला. या कसोटीत दोन्ही संघांशिवाय खरी गंमत आणली तर ती लॉर्डसच्या खेळपट्टीने.

पहिल्या दोन दिवसात खेळपट्टी जणुकाही सळसळती नागीण होती. तिच्या वेग आणि बाऊंसने भलेभले फलंदाज गांगरून गेले. पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी प्रत्येकी १४/१४ फलंदाजांना फस्त करत खेळपट्टीने आपले जहाल रूप दाखवले होते. मात्र या रणात पहिल्या डावात ऑसींच्या स्टीव्ह स्मिथ, वेबस्टर यांनी किल्ला लढवला तर आफ्रिकेच्या टेंबा बवुमा आणि बेडींघमला थोडाफार प्रतिकार करता आला. पहिल्या डावात ऑसींना ७४ धावांची बहुमूल्य आघाडी मिळाली होती. मात्र त्यांचा दुसरा डाव पुन्हा एकदा दोनशेत संपल्याने त्यांना मोठी आघाडी घेता आली नाही. ऑसींचे दुर्दैव म्हणा की आफ्रिकेचे सुदैव म्हणा, तिसऱ्या दिवशी खेळपट्टी वाल्याची वाल्मिकी झाली होती.

तिसऱ्या दिवशी पहिल्या आणि दुसऱ्या सत्रात प्रत्येकी दोन विकेट्स गेल्या. तिसऱ्या सत्रात तर मार्करम बवुमा जोडीने आरामात फलंदाजी करत सामना पुर्णपणे आफ्रिकेकडे वळविला होता. चौथ्या दिवशीचा खेळ म्हणजे खरेतर आफ्रिकेच्या विजयाची औपचारिकता होती परंतु कांगारू सहजासहजी सामना सोडणार नव्हते. तरीपण खेळपट्टी आपल्या शांत सौम्य रूपात कायम असल्याने कांगारूंची दाळ शिजली नाही. आस्ट्रेलिया संघाने कधी नव्हे ते गचाळ क्षेत्ररक्षण करत सामन्यात पुनरागमनाचा संधी दवडली. मार्करमला २३ धावांवर तर बवुमाला ३ आणि ४३ धावांवर जीवदान देत कांगारूंनी आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला.

स्टीव्ह स्मिथ, वेबस्टर आणि लेक्स कॅरी वगळता इतर फलंदाजांचा विशेषतः ट्रॅव्हिस हेडचा फ्लॉप शो कांगारूंच्या मुळावर आला. तर गोलंदाजीत कमीन्सने पहिल्या डावात सहा बळी जरूर घेतले पण दुसऱ्या डावात तो आणि त्याचे सहकारी बेअसर ठरले. आफ्रिकेच्या रबाडाने दोन्ही डावात धारदार गोलंदाजी करत तब्बल ९ बळी टिपले. त्याला जान्सेन आणि एनगीडीने उत्तम साथ दिली. तर फलंदाजीत पहिल्या डावात पिछाडीवर असतानाही मार्करम बवुमा जोडीने दमदार फलंदाजी करत सामना जिंकून दिला.

टी ट्वेंटी विश्वचषक, चॅम्पियन ट्रॉफी पाठोपाठ कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत कांगारूंचे गर्वहरण झाले असून द. आफ्रिका नवा विजेता म्हणून उदयास आला आहे. १९९८ ला बांगलादेशात झालेल्या चॅम्पियन ट्रॉफीच्या विजयानंतर या संघाला आयसीसी चषकासाठी जीवघेणी प्रतीक्षा करावी लागली. मग तो स्मिथ असो की एबीडी अथवा शॉन पोलॉक, डेल स्टेन असो द. आफ्रिका संघाची जेतेपदाला हुलकावनी म्हणजे पप्पू कान्ट डान्स साला होती. मात्र छोटी हाईट बिग फाईट असलेल्या टेंबा बवुमाने आपल्या नेतृत्वात आफ्रिका संघाला हिमालयाची उंची गाठून दिली आहे. छोटे तीर घाव गंभीर सारखे त्याने तुलनेत कमी अनुभवी संघाला जगज्जेता बनवले आहे. थोडक्यात काय तर टेंबा बवुमाने आपल्या लिलयेने आफ्रिका संघाला पंगुं लंघयते गिरिम करून दाखवले आहे.

**-डॉ. अनिल पावशेकर**
नागपूर
मो. ९८२२९३९२८७

## थोडक्यात...

### राणी माळवे यांची गटविकास अधिकारीपदी निवड



**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत वर्ग – एक मधील गटविकास अधिकारीपदी राणी गुलाबराव माळवे यांनी परीक्षेत यश मिळविले आहे. त्यांनी भौतिकशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी केली. त्यात गटविकास अधिकारी वर्ग एकसाठी त्यांची निवड झाली आहे. कोणताही क्लास न लावता स्पर्धा परीक्षेची तयारी त्यांनी घरी राहूनच केली. एमपीएससी परीक्षेनंतर आता भारतीय प्रशासकीय सेवेत जाण्याची त्यांची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले. या यशाबद्दल राणी माळवे यांचे माहूर तालुक्यासह जिल्हाभरात सर्वत्र कौतूक होत आहे.

### बिडी कामगारांच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्रातील चुनखडी, डोलोमाईट, बिडी, खनिज खान कामगारांच्या मुलांना मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या पाल्यांसाठी शिष्यवृत्तीसाठी आर्थिक सहाय्य योजना सुरु केलेली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पहिली ते चौथी, पाचवी ते दहावी, अकरावी ते बारावी, तसेच आय.टी.आय, पॉलीटेक्निक, पदवी अभ्यासक्रम (बि.एस.सी, कृषीसह) बि.ई, एम.बी.बी.एस., एम.बी.ए.साठी https://scholaarship.gov.in वर शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० ऑगस्ट पर्यंत आहे.

# उत्पन्नवाढीत कंधार आगाराचे नाव विभागात अव्वल यावे

## आ. चिखलीकर यांच्या हस्ते पाच नवीन लालपरी बसेसचे लोकार्पण



**कंधार (प्रतिनिधी)**– प्रवाशांच्या सेवेसाठी आता पाच नवीन बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे कंधार आगार हे उत्पन्न वाढीच्या बाबतीमध्ये नांदेड विभागातून प्रथम आले पाहिजे यासाठी महामंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करावे, असे आवाहन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

आ. चिखलीकर यांच्या पाठपुराव्यामुळे कंधार बस आगाराला पाच नवीन लाल परी बसेस मिळाल्या आहेत. त्या नवीन पाच लाल परी बसेसचे लोकार्पण सोमवार दि.१६ जून आमदार चिखलीकर यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड येथील विभाग नियंत्रक चंद्रकांत वडजकर तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, कंधारचे आगार प्रमुख अभय वाढवे, प्रा. किशन डफडे, माजी नगराध्यक्ष स्वप्निल पाटील लुंगारे, पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव, आनंदराव ढाकणीकर, लक्ष्मण बोडके, माजी नगरसेवक शिवाजी लुंगारे, मधुकर डांगे, राजकुमार केकाटे, शिवाजी जाधव, मारुती पंढरे यांची उपस्थिती होती.

आमदार चिखलीकर म्हणाले की, एसटी बससेवा ही गोरगरीबांसाठी वरदान आहे. सर्वात सुरक्षित व विश्वासार्ह सेवा आहे. पण विविध आंदोलने, मोर्चे काळात सर्वात आधी बसेसला फटका बसतो. आंदोलनाचा पहिला वार हा एसटीवर करत असतो. त्यामुळे आपल्या सर्व गोरगरिबांचे वाहन असणारी बस याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. त्यासाठी आपण सर्वांनी सामाजिक बांधिलकी राखत सर्वसामान्यांचे संरक्षण करावे, एसटी बसही गोरगरिबांना प्रवासासाठी मदत करत असते, हा सामाजिक दृष्टिकोन समोर ठेवून एसटी बसचाही आपण सन्मान करावा, असे आ.चिखलीकर म्हणाले.

त्यानंतर कंधार बस आगाराच्यावतीने उपस्थित मान्यवरांचा शाल, पुष्पहार घालून यथोचित सन्मान करण्यात आला. अंकुश कदम यांनी प्रास्ताविक केले तर आगार प्रमुख अभय वाढवे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून शेवटी उपस्थितांचे आभारही मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ईश्वर गोरे प्रभारक, जगदीश मटंगे वाहतूक निरीक्षक, राजेंद्र कदम, सौ. गीता आंबेकर, डि.के. केंद्रे, ज्ञानेश्वर कोंडामंगले, चंद्रकांत श्रीमंगले, गोणारे, ब्रह्मदेव गीते, भगवान चव्हाण, संभाजी धाबेवार, गोविंद शिंदे यांच्यासह यांत्रिक कर्मचारी, वाहक – चालक यांनी परिश्रम घेतले.

# ज्येष्ठ नागरिक अत्याचार प्रतिबंधक जागरुकता दिनाच्या कार्यक्रमाला प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)**– जागतिक वृद्ध दिन अर्थात ज्येष्ठ नागरिक अत्याचार प्रतिबंधक जागरुकता दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने वृद्धांच्या हक्कांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला जिल्हाभरातील ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमात वृद्धांच्या अनेक प्रश्नांचे निराकरण करण्यात आल्याचे आयोजक डॉ. हंसराज वैद्य यांनी सांगितले.

पोलीस उप अधिक्षक डॉ. अश्विनी जगताप यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सुभाष बाऱ्हाळे, निर्मला बाऱ्हाळे, पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम, ॲड. एम.झेड.सिद्दीकी, विजया भरकड, प्रभाकर कुंटूरकर, गिरीष बाऱ्हाळे, रामचंद्र कोटलवार, माधवराव पवार, डॉ. ज्योति डोईफोडे, मिर्झा बेग यांची उपस्थिती होती.

याच कार्यक्रमात सौ. हडसनकर, श्रीमती प्रभा चौधरी, योगा गुरू श्रीमती हुरणे, सुषमा गहिरवार, श्रीमती खान, सुरजितसिंघ पूजारी, महिला सहाय कक्षाच्या पोलीस अधिकारी मीरा वच्छेवार, शिवाजी टाक यांचा संगीतमय कार्यक्रम झाला.

डॉ.हंसराज वैद्य यांनी प्रास्ताविक केले. पोलीस उपअधिक्षक (गृह) डॉ.अश्विनी जगताप म्हणाल्या की, ज्येष्ठांचे शोषण, त्यांच्यावर होणारे अत्याचार खपवून घेतले जाणार नाहीत. आम्ही विशेष काळजी घेऊ असे आश्वासन दिले. ॲड. एम. झड. सिद्दिकी यांनी ज्येष्ठांच्या पारित अनेक कायद्यांचा उहापोह करून शेवटच्या श्वासा पर्यंत मी ज्येष्ठ नागरिकांच्या कायद्याच्या कुठल्याही अडचणीत विना मुल्य सेवेस सदैव तयार असल्याचे सांगीतले. विधिज्ञ विजया भरकड यांनी कायद्याची माहिती दिली. डॉ. लक्ष्मी पुरणशेट्टीवार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.पुष्पा कोकीळ यांनी आभार मानले.



**नांदेड** : जवाहरनगर, तुप्पा येथील जिल्हा परिषद शाळेत पहिल्या दिवशी आ. आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजीराव कदम, ग्रामपंचायत सदस्य चिमणाजी पाटील कदम, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्ता पाटील कदम, शाळा मुख्याध्यापक बळीराम राठोड यांच्यासह वसरणी केंद्रप्रमुख मठपती, आनंद पवार, मोहन कुलकर्णी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचादी उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस)

# आ. श्रीजया चव्हाण यांनी लक्ष घालताच पशूसंवर्धन विभागाकडून मेंढला येथील जनावरांवर उपचार सुरू

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील मेंढला येथील अनेक जनावरांना लंपी आजाराची लागण झाली होती. पशूसंवर्धन अधिकारी लक्ष न देता शेतकऱ्यांना तिन ते चार दिवसांपासून टोलवाटोलवी करीत होते. पण आमदार ॲड. श्रीजया चव्हाण यांनी लक्ष घालताच पशूसंवर्धन विभाग जागा झाला आणि मेंढला येथील जनांवरांवर उपचार सुरु झाले.

लंपी हे संसर्गजन्य आजार असून जनावरांवर वेळीच उपचार केल्यास आजार आटोक्यात येतो. यासाठी पशूसंवर्धन विभागाकडून वेळीच तत्परता दाखविली जात नाही. मेंढला येथील सरपंच प्रतिनिधी दत्ता पाटील नवले यांनी यांनी आमदार श्रीजया चव्हाण यांना फोन करून माहिती दिली. आमदार चव्हाण यांनी तात्काळ दखल घेऊन पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांना झापले. त्यानंतर लगेच सोमवारी दि.१६ पशुसंवर्धन अधिकारी मेंढला येथे पोहचले.



लंपी आजार असलेल्या जनावरांची तपासणी करून उपचार सुरू केले आहेत. लंपी आजारामुळे जनावरांना उभे सुध्दा टाकता येत नव्हते शेतकरी वर्ग अडचणी आला होता. अधिकारी दाद देत नव्हते. पण आमदार श्रीजया चव्हाण यांनी वेळीच दखल घेतल्याने मेंढला येथील आजारी जनावरांवर वेळीच उपचार झाले.

# सोमेश्वर परिसरात मोकाट कुत्र्यांचा धुमाकूळ

## दुभत्या म्हैशींचा भरदिवसाच पाडला फडशा

**नांदेड (प्रतिनिधी)**– सहा महिन्यांपासून सोमेश्वर येथे मोकाट कुत्र्यांनी धुमाकूळ घातला आहे. या मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात भर दिवसा म्हशींचा जीव गेला आहे. त्यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

सोमेश्वर येथे सहा महिन्यांपासून मोकाट कुत्र्यांनी धुमाकूळ घातला आहे. चार दिवसातच कुत्र्यांनी चार म्हैसींचा फडशा पाडला आहे. यात अनेक पाच–सहा शेळ्याही फस्त केल्या आहेत. यामुळे आखाड्यावरील शेतकऱ्यांच्या जनावरांचा जीवही धोक्यात आला आहे. दुभत्या म्हशी कुत्र्यांच्या तावडी सापडत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या कुत्र्यांच्या हल्ल्यात झालेल्या म्हशी व शेळ्यांच्या मालकांना सरकारने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे. तसेच परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सोमेश्वर ग्रामपंचायतीने तात्काळ भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

# शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या पद्धतीने स्वागत









**नांदेड (प्रतिनिधी)**– विदर्भ वगळता संपूर्ण महाराष्ट्रात सोमवारी (दि. १६) शाळेची घंटा वाजली. नांदेड महानगरपालिकेच्या वजिराबाद येथील पीएमश्री शाळेचीही घंटा वाजली. शाळेच्या पहिल्याच दिवशी महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे, उपायुक्त नितीन गाढवे, शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात पार पडला.

प्रथम पहिली वर्गात प्रवेशित विद्यार्थ्यांना फेटा बांधला गेला. अगदी अतिथी सारखं. त्यांचं सुरुवातीला शाळेच्या गेटवरच स्वागत केलं गेलं. या स्वागतासाठी उपायुक्त नितीन गाढवे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबाचे फुल देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक परमेश्वर माहुरे व शिक्षक श्रीमती मगरे, उन्हाळे, चांदणे, श्रीमती केंद्रे, श्रीमती वडजे, पतंगे, कदम, यम्मेवार देवकते, पवार, निखिल, सेवक धनमने, खिल्लारे, श्रीमती गिरी यांनी परिश्रम घेतले.

**पोलीसवाडी जि.प. शाळा**

**लोहा (प्रतिनिधी)**– जि. प. प्रा. शाळा पोलीसवाडी येथील जि. प. प्रा. शाळेत शाळेच्या पहिल्याच दिवशी जि. प. बांधकाम विभागाचे उपअभियंता शिवाजी राठोड यांनी पहील्या वर्गात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य व गुलाबपुष्प देवून स्वागत केले. जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांची पट संख्या दरवर्षी कमी होत आहे याची दखल घेवून यावर्षी प्रथम जि.प.च्या वतीने प्रत्येक अधिकाऱ्यांना एक एक शाळा दत्तक देण्यात आली आहे. जि.प.प्रा.शाळा पोलीसवाडी ही शाळा जि.प.बांधकाम विभाग लोहयाचे उपअभियंता शिवाजी राठोड यांनी दत्तक घेतली आहे. यापुढे शाळेच्या अडीअडचणी काय आहेत याची माहिती घेवून त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सरपंच तेजेराव बाजगीर, माजी सरपंच पिराजी धुळगंडे, उपसरपंच मोहन हुगे, कनिष्ठ अभियंता आकाश कवठाळे, नवनाथ पोले, लक्ष्मण कवडे, विठल कवडे, माजी उपसरपंच संग्राम हाके, बालाजी पोले, मुख्याध्यापक स्वामी, परमेश्वर तिडके, केंद्रे, अशोक ढमणे, सिध्देश्वर बाजगीर, सहशिक्षिका ज्योती सरोदे व विद्यार्थी उपस्थित होते.

**शेंबोली जि.प. शाळा**

**नांदेड (प्रतिनिधी)**– शेंबोली (ता. मुदखेड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीतील नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत व प्रवेश उत्सव साजरा करण्यात आला. प्रथम शालेय समितीचे अध्यक्ष बळीराम दुबेवाड व मुख्याध्यापकांनी नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, टिळा लावून व गुलाबाचे फुल देऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. ग्राम पंचायत शेंबोली उपसरपंच मधुकर गोवंदे व अमोल इरलेवाड, नरसिंग दुबेवाड, गोविंद गोरेवाड, पालकांनीही शाळेतील प्रगतीचे कौतुक केले. शेवटी पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार मारोतराव जगताप यांच्या हस्ते नवागत पहिलीतील विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले मुदखेड यांनी भेट देऊन शाळेविषयी समाधान व्यक्त केले.

यावेळी शाळेतील शिक्षक अरुण अतनुरे केंद्रप्रमुख बारड, रामकृष्ण लोखंडे, मंगला महाजन, सुनिता केंद्रे, छाया मठदेवरु, जयश्री गायकवाड, संगीता वादळे उपस्थित होते. नागापूर शाळेतही विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. यावेळी गावातील मान्यवरांच्या हस्ते सर्वांना मोफत पाठ्यपुस्तक, पेन्सिल वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना घडी पत्रिका देऊन त्यांचा पहिली प्रवेश संस्मरणीय करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अंकुश पाटील मस्के, सरपंच दत्ता पाटील करडीले, तंटामुक्ती अध्यक्ष दिलीप पाटील मस्के, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष संतोष पाटील मस्के, गणेश पाटील मस्के, बळी पाटील सपुरे, सदस्य मारोती पाटील मस्के, संदीप पाटील मस्के, विठ्ठल गजभारे, आनंदा पाटील सपुरे, अशोक पाटील मस्के, परमेश्वर पाटील मस्के, देवानंद पाटील मस्के व पालकांची उपस्थिती होती.

**श्री भास्करराव बापुराव पाटील खतगावकर शाळेत चॉकलेटचे वाटप**

**शंकरनगर (प्रतिनिधी)** – श्री भास्करराव बापुराव पाटील खतगावकर, श्री साईबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सावित्रीबाई फुले इंग्लिश स्कूल, शिवनेरी पोतदार पोतदार ई लर्निंग स्कूल बिजुर व रामतीर्थ, किनाळा, हिपरगामाळ, चिटमोगरा, केरुर, येथील जिल्हा परिषद शाळेत शाळेत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्पगुच्छ देऊन प्रवेश देण्यात आला.

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा, त्याचे मनोबल वाढावे तो शाळेविषयी त्याची त्याच्या मनामध्ये असलेली भीती नाहीशी व्हावी, शाळेविषयी आपुलकी निर्माण व्हावी, व तो शाळेत येण्यासाठी कसा आकर्षित होईल हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन प्रत्येक विद्यार्थ्यांचे प्राचार्य यांच्या हस्ते चॉकलेट पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

शाळेतील प्राचार्यांनी विद्यार्थी शाळेकडे आकर्षित कसा होईल या धर्तीवर शिक्षणाचे धडे दिले पाहिजे व ती काळाची गरज आहे. विद्यार्थी व शिक्षक यांचे संबंध आपुलकीचे असणं गरजेचे आहे. शाळेप्रती त्यांच्या मनामध्ये प्रेम निर्माण होईल व तो शाळेकडे आकर्षित होईल यासाठी शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

**नरसिंह विघा मंदिर**

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सिडको येथील नरसिंह विद्या मंदिरात नवगतांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले तर पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.

सोमवारी दि.१६ जून रोजी शैक्षणिक वर्षातील पहिल्या दिवशी नवीन पहिल्या वर्गातील प्रवेश घेतलेल्या मुलाचे गुलाब पुष्प देवून स्वागत करण्यात आले व शाळेच्या पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती व्हि. ए. एंकुडवार ह्या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षीका सौ.संगेवार, पालक प्रतिनिधी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. बस्वदे यांनी कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन केले. यावेळी शाळेय समितीचे पदाधिकारी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ज्योती प्राथमिक शाळा**

**नरसी (प्रतिनिधी)**– येथील ज्योती प्राथमिक शाळेत शाळेच्या पहिल्याच दिवशी चिमुकल्या विद्यार्थ्यांचे शाळेच्या प्रांगणात पाऊल पडताच सर्व शिक्षकांनी गुलाब पुष्प व चॉकलेट देऊन स्वागत केले.

ज्योती प्राथमिक शाळेतील शिक्षकांकडून शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर भव्य सजावट करून शाळेतील सर्वच वर्ग खोल्याची फुलांच्या हारांनी सजावट केली होती. सकाळी शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प व चॉकलेट देऊन त्यांनी सन्मानपूर्वक वर्गात घेऊन जात असताना विद्यार्थी आनंदी दिसत होते. मुख्याध्यापक सय्यद मोईन, गणपत इंगोले, तानाजी कदम, सुभाष चिखले, श्याम बंडगर, संभाजी मुंडकर, जावेद खुशाल, रमेश कल्याणकर, शेख अफरोज, ज्योती चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– खैरगाव येथील शाळेत विद्यार्थ्यांना फुले व शालेय साहित्य देऊन पहिल्याच दिवशी स्वागत करण्यात आले. यावेळी केंद्रप्रमुख चंद्रकांत देशपांडे, साधन व्यक्ती जाधव, शिक्षण समितीचे अध्यक्ष कचरू पवार, मुख्याध्यापक सचिन काळे, लक्ष्मण पंदिला, सुजाता मुंडे यांच्यासह पदाधिकारी, पालक उपस्थित होते.













स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

## फळपीक विमा योजना मृग बहार 2025 साठी सहभाग घ्यावा

फळपीक विमा योजना मृग बहार २०२५ साठी शेतकऱ्यांनी भाग घेण्यासाठी विमा एनसीआयपी (NCIP) पोर्टल www.pmfby.gov.in सुरू झाले आहे. यात भाग घेण्यासाठी प्रत्येक फळनिहाय अंतिम दिनांक पुढील प्रमाणे आहे. लिंबू, द्राक्ष, पेरू, संत्रा : १४ जून , मोसंबी ,चिकू ३० जून, डाळिंब १४ जुलै, सीताफळ ३१ जुलैपर्यंत पीक विमा उतरवता येऊ शकतो. कमी पाऊस, जास्त पाऊस, पावसातील खंड, जास्त आर्द्रता या सारख्या हवामान घटक यांचा उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसान परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळते. योजनेत भाग घेण्यासाठी आवश्यक बाबी : Agristack नोंदणी क्रमांक, आधार कार्ड, बँक पासबुक,जमीन धारणा उतारा, Geo tag फोटो, ई-पिक पाहणी बंधनकारक आहे, ई-पीक पाहणी नोंद नसल्यास पिक विमा अर्ज रद्द होऊ शकतो. पिक विम्यात भाग घेतल्यानंतर ई- पीक नोंदणी जुलै- ऑगस्ट महिन्यात करू शकतात. जास्त माहिती घेण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.





## सुरक्षित फवारणी

**शेती करताना कीड नियंत्रणासाठी किटकनाशकांचा वापर अपरिहार्य असतो. मात्र त्याचा वापर करताना शेतकऱ्यांनी योग्य ती काळजी घेतली नाही, तर याचे दुष्परिणाम आरोग्यावर होऊ शकतात. अनेकदा फवारणी करताना साध्या चुकांमुळे विषबाधा होऊन अपघात किंवा आजार उद्भवतात. त्यामुळे किटकनाशके फवारण्यापूर्वी, फवारताना आणि फवारणीनंतर काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे...**



फवारणी करण्याआधी वापरण्यात येणाऱ्या रसायनाच्या बाटलीवरील लेबल, सूचना पत्रक नीट वाचावे. त्या प्रत्येक रसायनाच्या विषारीपणाची पातळी वेगळी असते. यासाठी बाटल्यांवर लाल, पिवळा, निळा आणि हिरवा अशा रंगाचे त्रिकोणी चिन्ह असते. लाल रंग हे अत्यंत विषारी रसायन दर्शवते. या रंगांच्या आधारे निरक्षर व्यक्तीलाही त्या किटकनाशकाचे स्वरूप लक्षात येते. फवारणीसाठी वापरण्यात येणारे यंत्र हे योग्य स्थितीत असावे. पंपाचे नोझल गळके असेल तर त्याचा वापर करणे टाळावे. तणनाशकासाठी वापरलेला पंप कीटकनाशकासाठी वापरू नये. मिश्रण तयार करताना सुरुवातीला थोड्या पाण्यात भुकटी मिसळून मग गरजेनुसार पाणी टाकावे. हे करताना हातात हातमोजे व तोंडाला मास्क लावणे आवश्यक असते. शरीर झाकलेले राहील अशा प्रकारचे कपडे वापरावेत. डोक्यावर कापड, पायात बूट आणि पूर्ण बाह्यांचे शर्ट, पायजमा वापरणे फायदेशीर ठरते. फवारणी करताना वाऱ्याच्या दिशेनेच फवारणी करावी. पावसाच्या वेळी किंवा पाऊस होण्याची शक्यता असताना फवारणी करू नये. फवारणीनंतर लगेच शेतात प्रवेश करणे टाळावे. फवारणी करत असताना खाणे, पिणे किंवा धूम्रपान करणे टाळावे. एक दिवसात सलग ८ तासांपेक्षा जास्त फवारणीचे काम करू नये आणि उपाशीपोटी फवारणी करणे आरोग्यदृष्टीने धोकादायक असते. सकाळी न्याहारीनंतरच हे काम करावे. फवारणी झाल्यावर हात, पाय, चेहरा आणि इतर अंग साबणाने स्वच्छ धुवून घ्यावा. वापरलेले कपडे वेगळे ठेवावेत. वापरलेले साहित्य स्वच्छ करून सुकवून सुरक्षित स्थळी ठेवावे. हे साहित्य विहिरी, नदी किंवा ओढ्याजवळ धुणे टाळावे. वापरलेले पाणी पडिक जागी टाकावे. रिकाम्या बाटल्या जमिनीत पुराव्यात.

### विषबाधा झाल्यास...

विषबाधा झाल्यास थोड्याच वेळात काही लक्षणे दिसून येतात, जसे की चक्कर येणे, उलटी होणे, डोळ्यांतून पाणी येणे, अंगावर चट्टे उठणे, डोळे अंधुक दिसणे, स्नायूंमध्ये वेदना होणे किंवा बेशुद्ध होणे. अशी लक्षणे दिसताच रुग्णास त्वरित नजीकच्या दवाखान्यात नेणे आवश्यक आहे. डॉक्टरांना नेमके कोणते किटकनाशक वापरले गेले होते, किती प्रमाणात आणि किती वेळापूर्वी हे घडले, याची माहिती दिल्यास उपचार अधिक योग्य प्रकारे करता येतात. विषबाधा झाल्यावर रुग्ण पूर्ण शुद्धीत असेल तरच त्याला उलटी करण्यास प्रवृत्त करावे. अन्यथा तसे करू नये. कधीकधी प्राथमिक उपचार म्हणून कोळशाची भुकटी पाण्यात मिसळून दिली जाते. परंतु हेही डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसारच करावे. शेतीच्या आधुनिक काळात रसायनांचा वापर अपरिहार्य असला, तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने खबरदारी घेणे हे शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने किटकनाशक वापरताना योग्य ती दक्षता घ्यावी, यासाठीच ही माहिती सर्वांना समजून घेणे गरजेचे आहे.



# फायदेशीर सघन कापूस लागवड

**कापूस पिकाच्या जागतिक उत्पादकता (७५० किलो) आणि राष्ट्रीय उत्पादकता (४३९ किलो रुई) पाहता महाराष्ट्राची उत्पादकता (३२९ किलो) फारच कमी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे महाराष्ट्राच्या कापूस क्षेत्रापैकी मोठ्या प्रमाणात कोरडवाहू लागवड होते. कोरडवाहू शेतकऱ्यासाठी कापूस हे महत्त्वाचे नगदी पीक आहे. अशा स्थितीमध्ये या शेतकऱ्यांची उत्पादकता वाढविण्यासाठी अनुरूप लागवड पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.**

विदेशातील लागवड पद्धतींचा अभ्यास करून त्यांच्या प्रमाणेच भारतातही कमी अंतरावर लागवड करून हेक्टरी रोपांची संख्या वाढविल्यास उत्पादकता वाढविता येऊ शकते, यावर संशोधन सुरू झाले. मात्र भारतात प्रामुख्याने संकरित कापूस वाणांची लागवड होते. या बियाण्यांच्या किमती अधिक असल्याने उत्पादन खर्चात वाढ होते. सोबतच अधिक वाढ असणाऱ्या संकरित वाणांची लागवड कमी अंतरावर केल्यास झाडांमध्ये दाटी होऊन त्याचे दुष्परिणाम होण्याची भीती असते. यासाठी मागील दहा वर्षांत संशोधन होऊन कोरडवाहू भागातील शेतकऱ्यासाठी सघन कापूस लागवड पद्धत विकसित करण्यात आली आहे.

### सघन लागवड पद्धत म्हणजे काय?

कपाशीची लागवड कमी अंतरावर करून हेक्टरी/एकरी झाडांची संख्या म्हणजेच घनता वाढविणे, यालाच सघन लागवड पद्धत म्हटले जाते. सघन लागवड पद्धतीमध्ये योग्य लागवडीचे अंतर, त्यासाठी अनुरूप वाणांची निवड, पिकाची वाढ नियंत्रित ठेवण्यासाठी वाढ व्यवस्थापन आणि वाढविलेल्या झाडांच्या संख्येसाठी पुरेसा अन्नद्रव्यांचा पुरवठा या बाबींवर लक्ष केंद्रित करावे लागते.



### लागवडीचे अंतर

रोपांची संख्या वाढविण्यासाठी लागवडीचे अंतर कमी करायचे असते. त्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठामध्ये केलेल्या संशोधनानुसार बीटी कापूस वाणांच्या लागवडीसाठी ९० × ३० सेंमी (३ × १ फूट) अंतराची शिफारस केलेली आहे. म्हणजेच दोन ओळींतील अंतर ९० सेंमी (३ फूट) ठेऊन दोन झाडांतील अंतर ३० सेंमी (१ फूट) ठेवावे. या अंतरावर लागवड केल्यास एक एकर क्षेत्रामध्ये १४५२० रोपे बसतील. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रात विभागनिहाय व माती प्रकारानुसार कपाशीची लागवड ३ × २ फूट, ४ × १.५ फूट, ३ × ३ फूट, ४ × ३ फूट, ५ × १ फूट, ६ × १ फूट अशा विविध अंतरावर करण्यात येते. म्हणजेच या विविध पारंपरिक अंतरावरील लागवडीमध्ये एकरी झाडांची संख्या ७२६०, ४८४०, ३६३०, ८७१२ अशी असते. पारंपरिक लागवड पद्धतीपेक्षा सघन लागवडीमध्ये एकरी झाडांची संख्या दुप्पट ते चारपट राहते. या सघन लागवडीमध्ये एका झाडाला सरासरी २० बोंडे / कैऱ्या लागतील, असे अपेक्षित आहे.

### वाढरोधकाचा वापर

सघन लागवडीमध्ये झाडांची वाढ आटोक्यात (उंची तीन फुटांपर्यंत) ठेवण्यासाठी वाढरोधकांचा वापर करणे आवश्यक आहे. याकरिता मेपीक्वाट क्लोराइड या वाढरोधकाच्या १२ मिलि प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे दोन वेळा फवारण्या कराव्या लागतील. यापैकी पहिली फवारणी पिकास पाते लागण्याच्या काळात (सरासरी ४५ दिवस) व दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी म्हणजेच ६० दिवसांच्या (फुले लागण्याच्या) काळात करावी. फवारणी करताना जमिनीमध्ये ओल असणे आवश्यक आहे. जमिनीमध्ये ओल नसल्यास पाऊस होईपर्यंत ३-४ दिवस फवारणीसाठी थांबावे अथवा उपलब्धता आल्यास संरक्षित सिंचन देऊन फवारणी करावी. या वाढरोधकाच्या फवारणीमुळे कापूस पिकाच्या कांड्यांमधील अंतर कमी होते. म्हणजेच शाकीय वाढीसाठी वापरले जाणारे अन्नघटक फुले लागणे आणि बोंडाच्या वाढीकरिता वापरली जातात. म्हणजेच झाडाची उंची आणि फांद्यांची लांबी आटोक्यात राहते, पण फुले आणि बोंडांची वाढ होते. सघन लागवडीमध्ये पिकाची वाढ जास्त झाल्यास अपेक्षित उत्पादन मिळणार नाही, हे लक्षात ठेवा.

### खत व्यवस्थापन

आपण सघन लागवडीमध्ये झाडांची एकरी संख्या वाढविलेली असते. त्यांची वाढ आटोक्यात ठेवूनही या वाढलेल्या झाडांपासून अपेक्षित वाढीव उत्पादन यांचे एकत्रित एकरी जैविक वजन (शाकीय वाढ + कपाशीचे वजन) अधिक होणार आहे. या कापसाच्या वाढलेल्या जैविक उत्पादनासाठी आवश्यक अन्नपुरवठा करण्यासाठी आपल्या विभागात पारंपारिक पद्धतीने बीटी कापूस पिकासाठी असलेल्या शिफारशीपेक्षा (पारंपरिक शिफारस १२० N : ६० P : ६० K) यापेक्षा स्फुरद आणि पालाशची मात्रा २५ टक्के अधिक द्यावी. मात्र नत्राची एक व दोन महिन्यांनी द्यावयाची मात्रा देण्यापूर्वी पिकाची वाढ पाहूनच निर्णय घ्यावा. वाढ समाधानकारक असल्यास नत्राची मात्रा वाढवू नये. अन्यथा, नत्राची मात्रा जास्त होऊन शाकीय वाढ जास्त होईल आणि पाते-फुले यांची संख्या कमी होईल. म्हणून नत्रयुक्त खतांचा वापर कमी करावा.

### वाणांची निवड

सामान्यतः बीटी कापूस लागवडीमध्ये दीर्घ कालावधीची, वाढ अधिक असणारे व खत आणि सिंचनास प्रतिसाद देणारे संकरित वाण मोठ्या प्रमाणात वापरले जातात. तथापि, सघन लागवड पद्धतीसाठी आटोपशीर ठेवण असणारे (कॉम्पॅक्ट) वाण निवडणे आवश्यक आहे. म्हणजेच असे वाण की ज्यांच्या फांद्यांची लांबी आणि झाडाची उंची कमी आहे. बाजारातील बहुतांश वाण या निकषांमध्ये बसत नाहीत. काही निवडक कंपन्यांचे विशिष्ट वाणच सघन लागवडीस उपयुक्त आहेत. त्यामुळे सघन लागवडीसाठी उंची आणि फांद्यांची लांबी कमी असणारेच वाण निवडावे.



# सोयाबीन लागवड करताना या गोष्टी माहिती असाव्याच...

**जास्तीत जास्त उत्पादन देणारे नगदी पीक म्हणून अनेक शेतकरी सोयाबीन पिकाची निवड करतात. यंदा शेतकऱ्यांचा सोयाबीनकडे ओढा वाढला आहे. संपूर्ण देशभरातच यंदा सोयाबीनचे लागवड क्षेत्र वाढण्याचा अंदाज आहे. देशात मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र ही दोन राज्ये सायोबीन उत्पादनात आघाडीवर आहेत.**



महाराष्ट्र हा सोयाबीन उत्पादनात देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. देशातील एक महत्त्वाचे तेलबिया पीक म्हणून सोयाबीन ओळखले जाते. सोयाबीनचे क्रशिंग केल्यानंतर सोयापेंड किंवा डिओसी आणि सोयातेल ही दोन उत्पादने मिळतात. सोयापेंड पशुखाद्यामध्ये विशेषतः पोल्ट्री फीड म्हणून मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. पोल्ट्री उद्योगाचे कच्च्या मालाचे अर्थकारण सोयापेंडच्या किमती किती राहतात, यावर अवलंबून असते. दुसऱ्या बाजुला देशाची खाद्यतेलाची गरज भागवण्यासाठी सोयातेलाचा मोठा उपयोग होतो. देशात तेलबिया पिकांचे पुरेसे उत्पादन होत नसल्यामुळे खाद्यतेल आयातीवर अवलंबून राहावे लागते. या पार्श्वभूमीवर सोयाबीनमुळे देशातील २५ टक्के खाद्यतेलाची पूर्तता होते. महाराष्ट्रात सोयाबीनची उत्पादनक्षमता कमी आहे. राज्यात सरासरी हेक्टरी २५ ते ३० क्विंटल उत्पादकता असल्याचे कागदावर दिसते. परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांना सरासरी हेक्टरी १० ते १२ क्विंटलच्या आसपास उतारा पडतो. याचे महत्वाचे कारण म्हणजे सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब न करणे, कोरडवाहू लागवडीचे मोठे प्रमाण, दर हेक्टरी झाडांची अपुरी संख्या, बीज प्रक्रिया व उगवणशक्तीची तपासणी न करणे हे होत. तसेच योग्य खतांच्या मात्रांचा वापर शिफारशीत प्रमाणात न करणे, तण आणि रोग-किडींचा वेळेवर बंदोबस्त न करणे, आंतरपीक न घेणे आणि मर्यादीत यांत्रिकीकरण हीसुध्दा प्रमुख कारणे आहेत. अन्य देश सोयाबीन उत्पादकतेत भारताच्या पुढे आहेत. या देशांमध्ये प्रामुख्याने जनुकीय सुधारित (जीएम) तंत्रज्ञानाचा अवलंब केला जातो. हजारो हेक्टर क्षेत्रावर सलग लागवड करुन जमीन तयार करण्यापासून पेरणी, फवारणी व काढणीपर्यंत सर्व कामे यंत्राद्वारे केली जातात. रोग व किडींच्या आक्रमणाबद्दल माहिती देण्यासाठी प्रभावी पूर्वानुमान यंत्रणा उभारली जाते. रोग किडींच्या बंदोबस्तासाठी कीडनाशकांची ड्रोनद्वारे फवारणी केली जाते. त्यामुळे मजुरांवरील खर्च वाचतो. तसेच रासायनिक खते व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा संतुलित वापर होऊन उत्पादन वाढते.

### पेरणीचा कालावधी

सोयाबीनची पेरणी जूनच्या शेवटच्या आठवड्यापासून जुलैच्या दुसऱ्या पंधरवाड्यापर्यंत ७५ ते १०० मि. मी. पाऊस झाल्यानंतर जमिनीत पुरेशी आर्द्रता असल्याची खात्री करूनच करावी. पेरणी करण्यापूर्वी बियाण्यास शिफारशीत प्रमाणात बुरशीनाशकाची प्रक्रिया करून बियाणे सावलीमध्ये वाळवून योग्य वेळी पेरणी करावी.

### पेरणीसाठी अंतर

सोयाबीनची पेरणी ४५ बाय ५ सें. मी. किंवा ७.५ सें. मी. अंतरावर पाभर किंवा ट्रॅक्टरचलित सीड ड्रिलच्या साहाय्याने करावी. बियाणे २.५ ते ३.० सें. मी. खोलीपेक्षा जास्त खोल पेरू नये. अन्यथा बियाण्याची उगवण कमी होऊन उत्पादनात घट येऊ शकते. मध्यम आकार असणाऱ्या वाणांसाठी हेक्टरी ६५ किलो बियाणे वापरावे. बियाण्याची उगवणक्षमता ७० टक्क्यांपेक्षा कमी असेल तर गरजेनूसार प्रतिहेक्टर ५ ते १० किलो जास्त बियाणे वापरावे.

### पीकसंरक्षण

सोयाबीनवर प्रामुख्याने चक्रीभुंगा, खोडमाशी, विविध उंटअळ्या, तंबाखूवरील पाने खाणारी अळी, केसाळ अळ्या, पाने गुंडाळणारी अळी व पाने पोखरणारी अळी तसेच मावा तुडतुडे, पांढरी माशी, आदी रसशोषक किडींचा प्रादुर्भाव अढळतो. यासाठी नियमित सर्वेक्षण करुन किडींची संख्या आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्याची खात्री करुनच शिफारशीनुसार रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा. एकात्मिक कीड नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात. किडी रोगांच्या प्रादुर्भाच्या बरोबरीने अन्द्रव्यांच्या कमतरतेची लक्षणेही ओळखणे महत्वाचे आहे. किडींसोबतच सोयाबीनवर मूळकूज, शेंगा वाळणे, तांबेरा, मोझाईक इ. प्रमुख रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. रोग नियंत्रणासाठी रोगास प्रतिकारक्षम वाणांची निवड करावी. पिकांची फेरपालट करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास बुरशीनाशकाची प्रक्रिया करावी.

### खतांचा संतुलित वापर

३० किलो नत्र, ६० किलो स्फुरद, ३० किलो पालाश आणि २० किलो गंधक प्रतिहेक्टरी पेरणीच्या वेळेसच द्यावे. पेरणीनंतर नत्रयुक्त खतांचा वापर टाळावा. माती परीक्षण अहवालानुसार रासायनिक खतांची मात्रा कमी जास्त करावी. पेरणीनंतर पीक २० ते ३० दिवसांचे असताना कोळपणी व निंदणी करुन शेत तणविरहीत ठेवावे. सतत पडणाऱ्या पावसामुळे किंवा मजुरांच्या कमतरतेमुळे निंदणी व कोळपणी करण्यास अवघड होत असल्यास तणनाशकाचा वापर करावा. रोप, फुलोऱ्याची व शेंगा भरण्याची अवस्था या पाण्याच्या ताणास संवेदनशील अवस्था आहेत. या कालावधीत १५ ते २० दिवसांची पावसाची उघडीप झाल्यास या अवस्थेत पिकास पाणी दिल्यास उत्पादनात भर पडते.

### वाणांची निवड

पेरणीसाठी फुले किमया, फुले संगम, जे एस ३३५, जेएस ९३०५, एमएयुएस ७१, एमएयुएस ६१२ इ. सुधारित जातींची निवड करावी.



# उपमुख्यमंत्री शिंदे व पवार यांनी केले जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**सातारा (प्रतिनिधी)**–शाळा संस्कार घडविणारे मंदिर असून या मंदिरात शिक्षक हे देशाची उज्वल भावी पिढी घडवित असतात. विद्यार्थ्यांनीही कला, क्रीडा, साहित्य, संस्कृती यांसह सर्व विषयांमध्ये संपूर्ण ज्ञानक्षम होण्यासाठी शिक्षकांना प्रतिसाद द्यावा. विद्यार्थ्यांनी भरपूर अभ्यास करुन मोठे व्हावे व देशाचा तसेच राज्याचा नावलौकीक वाढावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

सातारा तालुक्यातील कोडोली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक केंद्र शाळेत शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत 'माझी शाळा आदर्श शाळा' उपक्रमांतर्गत उभारण्यात आलेल्या शाळेचेही उद्धाटन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले. यावेळी आमदार महेश शिंदे, आमदार मनोज घोरपडे, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शबनम मुजावर आदी उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी विविध उपक्रम राज्यशासन राबवित आहे. या शाळांमधील विद्यार्थी उच्च पदावर काम करित आहेत. माजी राष्ट्रपती स्व. ए.पी.जी. अब्दुल कलाम, राष्ट्रती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानींही शासकीय शाळांमध्ये शिक्षण घेतलेले आहे. शासनाचा आनंददायी शिक्षणावर भर आहे. विद्यार्थ्यांनी कोणताही दबाव न घेता शिक्षणाबरोबर खेळावरही भर दिला पाहिजे. सातारा जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या 'माझी शाळा आदर्श शाळा' हा उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे. शिक्षण विभागात अमुलाग्र बदल केले आहेत यामध्ये विद्यार्थ्यांचे दप्ताराचे ओझे कमी करणे, आनंददायी शिक्षण, मुलींना उच्च शिक्षण म ोफत यासह अनेक योजना राज्य शासन राबवित आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघर्ष करा व संघटीत व्हा असे सांगतले होते. त्यांनी लिहिलेल्या राज्यघटनेवर देशाचा कारभार चालत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थी स्पर्धांमध्ये टिकले पाहिजेत, अशा पद्धतीने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्यावे, असे आवानही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले. शाळा प्रवेशोत्सव २०२५ कार्यक्रमाअंतर्गत उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, आलेगाव पुनर्वसन या शाळेत विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले.

यावेळी गट विकास अधिकारी महेश ढोके, गटशिक्षणाधिकारी संजय महाजन, विस्तार अधिकारी शरीफा तांबोळी, केंद्र प्रमुख आशा धाडगे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वीरधवल (बाबा) जगदाळे आदी उपस्थित होते.

आज शालेय जीवनातील आठवणीला उजाळा मिळाला असे सांगून पवार म्हणाले, भावी पिढी घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना आधुनिक, दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देण्यासोबतच सर्व शाळांम ध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे ही राज्य शासनाची नैतिक जबाबदारी आहे. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, याकरिता राज्य शासन शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च करीत आहे

## टी.सी.हरवली

माझी पवन राजू इरलेवाड या नावाची इय्त्ता १२ पासची टिसी ० मार्कमेमो नांदेड ते मारतळा बस प्रवासात हरवली आहे सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी देणाऱ्यास येण्या-जाण्याचा खर्च व योग्य ते बक्षीस देण्यात येईल

**–संपर्क पत्ता –**

**श्रीदत्त पानशॉप मेन रोड मारताळा ता.लोहा मो.७७५६९३४१८४**

## टी.सी.हरवली

माझी पल्लवी भीमराव वाघमारे या नावाची बी. कॉम. पासची टी.सी. मुखेड ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील नंबरवर संपर्क करावे.**–संपर्क पत्ता– पल्लवी भीमराव वाघमारे मो. ९५६१५७१६१६**

## टी.सी.हरवली

माझी कुमारी अनुजा अविनाश जाधव या नावाची इयत्ता १२ वी पास (प्रथम प्रत) ची टी.सी क्रुष्णुर ते नांदेड प्रवास करते वेळेस हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधा.**–संपर्क पत्ता– अनुजा अविनाश जाधव रा. क्रुष्णुर ता. नायगाव जिल्हा नांदेड**

## टी.सी.हरवली

माझी महेश नंदूसिंह ठाकूर या नावाची बी.कॉम पासची टि.सी.जुना मोंढा ते कलामंदीर ऑटो प्रवास करीत असतांना हरवली आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा–

**–संपर्क पत्ता–**

**महेश नंदूसिंह ठाकूर**

**एम.जी.रोडा गाडीपुरा नांदेड**

## टी.सी.हरवली

माझी सोनाली ज्योतीबा हिंगोले या नावाची इयत्ता १२ वी पास ची टी. सी कांचननगर(एकदरा) ते रेल्वेस्टेशन नांदेड प्रवास करते वेळेस हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधा.

**–संपर्क पत्ता–मो.९९७०४५८०५५**

# महापुरच्या रेणुकादेवी आश्रमशाळेतील पृथ्वीराज भिकाणेचे जेईई परीक्षेत यश, देशात ६६ वा; 'आयआयटी'मध्ये होणार प्रवेश

**लातूर (प्रतिनिधी)**– लातूर तालुक्यातील महापूर येथील रेणुकादेवी उच्च माध्यमिक आश्रमशाळेचा विद्यार्थी पृथ्वीराज शशिकिरण भिकाणे याने जेईई (ग.ए.ए. वीरपलश) ऍडव्हान्स परीक्षेत मोठं यश मिळविलं आहे. देश पातळीवर अभियांत्रिकी शाखेत प्रवेश मिळवण्यासाठी आवश्यक जेईई ऍडव्हान्स परीक्षेत देशात ४९३ वा तर ओबीसी प्रवर्गात देशात ६६ वा क्रमांक मिळविला आहे. त्यामुळे आता त्याचा देशातील सर्वात टॉप आय.आय.टी. मुंबई किंवा दिल्ली कॉलेज मधील प्रवेश निश्चित झाला आहे.



देशभरातील १५ लाख विद्यार्थ्यांनी जेईई मेन्स २०२५ परीक्षा दिली होती. त्यामध्ये पृथ्वीराज ने ९९.८८ % मिळवले. त्यानंतर जेईई ऍडव्हान्स परीक्षेसाठी पृथ्वीराज भिकाने पात्र झाला. या परीक्षेसाठी देशभरातील अडीच लाख विद्यार्थ्यांमधून त्याने घवघवीत यश मिळवीत देशात ४९३ वा तर ओबीसी प्रवर्गात देशात ६६ वा क्रमांक पटकाविला. या निकालाने त्याचा अभियांत्रिकीसाठी सर्वोच्च असलेल्या भारतीय प्रौद्योगिकी संस्थान अर्थात आय.आय.टी. मधील प्रवेश निश्चित झाला आहे.

आश्रमशाळेत शिकून थेट आयआयटी मध्ये प्रवेश मिळविणारा तो बहुधा महाराष्ट्रातील एकमेव विद्यार्थी आहे. अभ्यासाच्या बळावर त्याने मिळविलेलं हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्याच्या या यशानंतर महापुरच्या रेणुकादेवी उच्च माध्यमिक आश्रम शाळेत त्याचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अहमदपूरच्या एकलव्य मागास सेवा समिती संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव भिकाणे म्हणाले की, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी हे यश प्रेरणादायी असून येत्या काळात अशाच पद्धतीची चिकाटी सर्वच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी दाखवावी. पृथ्वीराजचा हा निकाल आम्हा सर्व आश्रमशाळेसाठी भूषणावह असल्याचे गौरवोद्गार काढले. तर जिद्द, चिकाटी सह आई-वडील आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आपण हे यश मिळविल्याचे पृथ्वीराज भिकाणे सत्काराला उत्तर देताना म्हणाला.

याप्रसंगी संस्थेच्या कोषाध्यक्ष मुद्रिकाताई भिकाणे, प्राचार्य डॉ. शशिकिरण भिकाणे, मा. मुख्याध्यापिका सुनीता बिर्ले,प्रा. प्रणिता खंदाडे, आजी सरिता भिकाणे, आजोबा उत्तमराव भिकाणे, प्रा. ज्योती खंदाडे, प्रा. लतीफ शेख, प्रा. बालाजी कतुरे, प्रा. संतोष गुंडरे, प्रा. अमोल आलापुरे, प्रा. मीना पवार, प्रा. श्रीमती अरुणा बद्दे यांच्यासह इंदिरा गांधी प्राथमिक व रेणुका देवी माध्यमिक उच्च माध्यमिक आश्रम शाळा महापूर येथील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन म्हणून साजरा होणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी देशी गायींच्या संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. दरवर्षी २२ जुलै हा दिवस शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे. या निर्णयाचा अध्यादेश राज्य शासनाने निर्गमित केला आहे. यापूर्वीच देशी गायीस राज्यमातागोमाता म्हणून घोषित करण्यात आले असून, या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात मराठवाडा विभागात देवणी, लालकंधारी. पश्चिम महाराष्ट्रामध्ये खिल्लार, उत्तर महाराष्ट्रात डांगी तर विदर्भात गवळाऊ यांसारख्या देशी गायींच्या जाती आढळतात.

## जाहीर प्रगटन

मौजे तरोडा बु. ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील शेत गट नंबर ११० प्लॉट नंबर १० चा पुर्वकडील भाग साईज लांबी पुर्व पश्चिम १५फुट व रूंदी दक्षिण उत्तर ४०फुट एकूण क्षे.६०० चौरस फुटाचा प्लॉट लक्ष्मण रंगराव कल्याणकर रा.तरोडा बु.नांदेड यांचेकडून नंदाबाई संजय नरवाडे रा.मु.पो. कांडली ता.कळमनुरी जि.हिंगोली नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चुर्तसिमा खालील प्रमाणे

पुर्वेस- १२ फुट रूंद रोड, पश्चिमेस - लक्ष्मीबाई वाठोरे, दक्षिणेस- पालदेवार यांची मोकळी जागा, उत्तरेस- शिंदे वाप्टीकर यांची जागा


तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर शेत जमिनीचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**नंदाबाई संजय नरवाडे**
**रा.कांडली ता.कळमनुरी जि.हिंगोली.**
**मो.८५९१९२९११६,८६५२०२७४४८**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## Change In Name

My old Name is CHADAWAR PRIYALI DINKANRAO which now I am Changing as New Name PRIYA SANDEEP MUTTEPAWAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same, SIGN BY-PRIYA SANDEEP MUTTEPAWAR RADHA DAMODAR HIGHTS N.58 ASHOK NAGAR NANDED 431605 MO.9270080073, 9421932360

## Change In Name

My old Name is SANDIP DAMODHARRAO MUTTEPAWAR which now I am Changing as New Name SANDEEP DAMODHAR MUTTEPAWAR Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same, SIGN BY-PRIYA SANDEEPMUTTEPAWARRADHADAMODAR HIGHTSN.58ASHOKNAGARNANDED431605 MO.9225753500

## Change In Name

My old Name is SHAIKH MOINODDIN which now I am Changing as New Name SHAIKH MOINODDIN ABDUL RAHEMAN Hence forth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same, SIGN BY-SHAIKH MOINODDIN ABDUL RAHEMAN H.N.1-14-346 VIMANTAL ROAD JAVAL OPP HOTEL CHANDRALOK DURVESH NAGAR HINGOLI NAKA NANDED 431605 MO.9767489555

**निवडणूक निर्णय अधिकारी, लाभलक्ष्मी महिला बिगरशेती सहकारी पतसंस्था म. अर्धापूर, ता. अर्धापूर तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. अर्धापूर, नांदेड**

मी अरुणा केंद्रे, महाराष्ट्र सहाकरी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मा. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. अर्धापूर यांनी दिलेल्या मान्यतेनुसार तसेच मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश क्र. २८७६, दि. २९/०५/२०२५ अन्वये लाभलक्ष्मी महिला बिगरशेती सहकारी पतसंस्था म. अर्धापूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड या संस्थेच्या व्यवस्थापन समितीची सन २०२५ते २०३० या कालावधीची निवडणूक घेणेसाठी निवडणूक कार्यक्रमाचे विविध टप्पे खालीलप्रमाणे प्रसिद्ध करीत आहे:-

| अ. क्र. | मतदार संघाचे नाव | निवडावयाचे सदस्य |
|---|---|---|
| १ | सर्वसाधारण प्रतिनिधी | ६ |
| २ | अनुसूचीत जाती /जमाती प्रतिनिधी | १ |
| ३ | महिला प्रतिनिधी | २ |
| ४ | इतर मागास प्रवर्ग प्रतिनिधी | १ |
| ५ | विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासप्रवर्ग प्रतिनिधी | १ |
| | **निवडून द्यावयाचे एकूण सदस्य** | **११** |

**निवडणूक कार्यक्रम**
**(निवडणूक नियम ७५ पहा)**

| अ. क्र. | तपशील | दिनांक व वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याचा दिनांक | टप्पा पुर्ण | -- |
| २ | नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती दिनांक | (दि. १७/०६/२०२५ ते २३/०६/२०२५ वेळ स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत | सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. अर्धापूर यांचे कार्यालयात |
| ३ | प्राप्त नामनिर्देशनाची यादी प्रसिद्ध करणे | दि. २३/०६/२०२५ वेळ दु. ५.०० वा. | सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. अर्धापूर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर |
| ४ | नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक | २४/०६/२०२५ दु. १२.३० ते छाननी संपेपर्यंत | सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. अर्धापूर यांचे कार्यालयात |
| ५ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक | २५/०६/२०२५ वेळ स. ११.३० वा. | सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. अर्धापूर यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर |
| ६ | नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा दिनांक | दि. २५/०६/२०२५ ते ०९/०७/२०२५ वेळ स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत | सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. अर्धापूर यांचे कार्यालयात |
| ७ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास चिन्ह वाटप करणे व निवडणूक चिन्हासह उमेदवाराची यादी प्रसिद्ध करणे | दि. १०/०७/२०२५ वेळ स. ११.३० वा. | सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. अर्धापूर यांचे कार्यालयात |
| ८ | मतदान दिनांक, वेळ व ठिकाण | १९/०७/२०२५ वेळ स. ०८.०० ते ४.०० | लाभलक्ष्मी महिला बिगरशेती सहकारी पतसंस्था म. अर्धापूर, ता. अर्धापूर संस्थेच्या कार्यालयात |
| ९ | मतमोजणी दिनांक, वेळ व ठिकाण | दि. १९/०७/२०२५ मतदानानंतर लगेच | लाभलक्ष्मी महिला बिगरशेती सहकारी पतसंस्था म. अर्धापूर, ता. अर्धापूर संस्थेच्या कार्यालयात |
| १० | निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि. १९/०७/२०२५ मतमोजणीनंतर लगेच | लाभलक्ष्मी महिला बिगरशेती सहकारी पतसंस्था म. अर्धापूर, ता. अर्धापूर संस्थेच्या कार्यालयात |

**टिप :- निवडणूक कार्यक्रम सुट्टीचे दिवस वगळून सुरू राहील.**

मंजूर

ठिकाण :- अर्धापूर
**दिनांक :- १७/०६/२०२५.**

**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी**
**सहायक निबंधक सहकारी संस्था.तालुका अर्धापूर**

(अरुणा केंद्रे)
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**लाभलक्ष्मी महिला को. ऑप. क्रेडिट सो. लि. अर्धापूर**

हुतात्मा गोविंदराव पानसरे शिक्षण प्रसारक मंडळाचे,

## पानसरे (कनिष्ठ) महाविद्यालय, अर्जापूर

## थेट मुलाखत (WALK IN INTERVIEW)

हुतात्मा गोविंदराव पानसरे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, पानसरे कनिष्ठ महाविद्यालयात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ठराविक मानधनावर सहाय्यक शिक्षकाची पदे भरावयाची आहेत. तरी अर्हताप्राप्त उमेदवारांनी **थेट मुलाखतीसाठी दिनांक २६/०६/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० ते ०५:०० वा** पर्यंत मुळ कागदपत्रांसह महाविद्यालयात उपस्थित राहावे.

कनिष्ठ महाविद्यालय (ठराविक मानधन)

| अ.क | विषय | शैक्षणिक अर्हता | पद संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | अर्थशास्त्र | एम ए .(अर्थशास्त्र), बी.एड. | ०२ पूर्णवेळ |
| ०२ | हिंदी | एम .ए .(हिंदी), बी.एड . | ०१ पूर्णवेळ |
| ०३ | इग्रंजी | एम. ए.( इंग्रजी), बी.एड | ०१ अर्धवेळ |
| ०४ | शारीरिक शिक्षण | एम.ए/एम.कॉम./एम.एस.सी/ .बी .पी .एड .,एम. पी. एड. | ०१ पूर्णवेळ |
| ०५ | वाणिज्य | एम .कॉम., बी.एड. | ०१ पूर्णवेळ |
| ०६ | रसायनशास्त्र | एम .एस. सी( रसायनशास्त्र ), बी.एड. | ०१ (०६महिण्यासाठी) |

**( टिप: रसायनशास्त्र एम .एस. सी ( रसायनशास्त्र ) बी.एड. प्रस्तुती काळातील रजेवर गेलेल्या रिक्त पदावर (सहा महिने साठी)**

**शैक्षणिक अर्हता :**

१. एम. एस्सी., बी.एड., उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
२. अनुभवी उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
३. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांना प्रवास / दैनिक भत्ता दिला जाणार नाही.

**अर्ज करण्याची पद्धत** : अर्जामध्ये संपूर्ण नाव, पत्ता, शैक्षणिक अर्हता, जन्मतारीख व अनुभव यांचा स्पष्ट उल्लेख करावा. अर्जासोबत गुणपत्रके, प्रमाणपत्रे व अनुभव प्रमाणपत्र यांच्या स्वंय साक्षांकित सत्यप्रती जोडाव्यात.

अधक्ष/सचिव
हुतात्मा गोविंदराव पानसरे शिक्षण प्रसारक मंडळ
बिलोलीपों.कुंडलवाडी जि.नांदेड

प्र.प्राचार्य
पानसरे क.महाविद्यालय अर्जापुर
ता.बिलोली जि.नांदेड

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण द्यावे -खा. अशोक चव्हाण

**भोकर (प्रतिनिधी)-** शिक्षकांनी अधिक मेहनत घेऊन गुणवत्तापूर्ण शिक्षणाची कास धरताना विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करण्यावर भर द्यावा. तसेच नूतन शाळेस कोणत्याही भौतिक सुविधेचा अभाव भासू दिला जाणार नाही, असा विश्वास माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार खा. अशोक चव्हाण यांनी व्यक्त केला.

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नूतन, भोकर येथे १६ जून पासून नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरुवात झाली. उन्हाळी सुट्टीनंतर विद्यार्थ्यांमध्ये शालेय गोडी निर्माण व्हावी, तसेच नवीन वर्षाची सुरुवात प्रेरणादायी ठरावी, यासाठी प्रशासनातर्फे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व शासकीय अधिकाऱ्यांनी शाळांना भेटी देण्याचे नियोजन करण्यात आले होते. या अनुषंगाने खा.अशोक चव्हाण यांनी केंद्रीय प्राथमिक नूतन शाळेला भेट देत शैक्षणिक बाबींचा आढावा घेतला.



यावेळी तहसिलदार विनोद गुंडमवार गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे, मुख्याध्यापक पट्टेवाड सभापती जगदीश पाटील भोसीकर, माजी सभापती प्रकाश भोसीकर, किशोर पाटील लगळुदकर, भाजपा तालुकाअध्यक्ष दिवाकर रेड्डी, विनोद चिंचाळकर, उपसभापती बालाजी शामनवाड, पत्रकार एल. ए. हिरे, विशाल माने, आत्रिक पा.मुंगल, मिर्झा ताहेर बेग, डॉ.अशोक माझळकर,डॉ.राम नाईक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनिल शहा, विठ्ठल धोंडगे, प्रशांत कानडे यांची प्रमुख उपस्थिती होती

नूतन शाळा म्हणजे शंभर नंबरी सोनं असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढत शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीचे व शिक्षकांच्या कार्यशक्तीचे कौतुक केले. या शाळेत गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात शिक्षण घेत असून, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षक समर्पितपणे प्रयत्नशील आहेत. विद्यार्थी घडवण्याचे व्रत जर शिक्षकांनी उचलले, तर ही शाळा भविष्यात 'एक नंबर' ठरेल, अशा आशावादी भावना खा. चव्हाण यांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमाची रंगतदार सुरुवात. शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत व मनोहारी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. शाळेकडून प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर खा. अशोक चव्हाण यांनी विद्यार्थ्यांशी मोकळेपणाने संवाद साधत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक सहशिक्षक कदम यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नूतन शाळेच्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

# शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये समन्वय ठेवा

## शाळेच्या पहिल्या दिवशी आ. चिखलीकरांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

**नांदेड (प्रतिनिधी)-** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जा सुधारण्याची गरज आहे. त्यासाठी शिक्षक आणि पालक आणि विद्यार्थ्यांसोबत समन्वय ठेवावा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन ग्रामीण भागातील शिक्षणाचा भक्कम पाया उभारावा असे आवाहन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे.



शाळेच्या पहिल्याच दिवशी सोमवारी आ. चिखलीकर यांनी कलंबर बुद्रुक, उस्मान नगर, सोनखेड आदी ठिकाणच्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वागत करून उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी माजी सभापती आनंदराव शिंदे, माजी उपसभापती नरेंद्र गायकवाड, माजी जि.प. सदस्य बालाजी परदेशी, संचालक साहेबराव काळे, बाबू मुक्कानवार, सरपंच म न्नसिंग लाला, लक्ष्मणराव बोडके, श्रीधर गोरे, उमाकांत सोरगे, हनुमंत भोपळे, बळी पाटील तसेच कंधार तहसीलदार रामेश्वर गोरे, गटविकास अधिकारी महेश पाटील, वारकड गुरुजी, माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, लक्ष्मणराव बोडके, साईनाथ पाटील कपाळे, माधवराव भिसे, संजय वारकड, सुरेश बास्टे, बाबुराव पाटील, वैजनाथ पाटील घोरबांड, उस्माननगरच्या सरपंच शोभाताई काळम, मंडळ अधिकारी गजानन आईनवाड, शिंदे, तलाठी जिवंत, शिवशंकर काळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. दुल्लेवाड, डॉ. लोणे, पप्पू कदम व इतरांची उपस्थिती होती.

# जिल्हा परिषद शाळांतील शिक्षण आजही दर्जेदार -आयुक्त डॉ. डोईफोडे

**नांदेड (प्रतिनिधी)-** मी जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी आहे. जिल्हा परिषद शाळेत शिकून मोठमोठ्या पदावर असंख्य विद्यार्थी गेलेले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेत पालकांनी आपल्या पाल्याला प्रवेश द्यावा. जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षणदानाची गुणवत्ता आजही दर्जेदार आहे, असे प्रतिपादन नांदेड महापालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले.

शाळेचा प्रवेशोत्सव केंद्रीय जिल्हा परिषद शाळा वसरणी येथे उत्साहात पार पडला. यावेळी ते बोलत होते.



यावेळी शिक्षण अधिकारी व्यंकटेश चौधरी, माजी नगरसेवक संजय मोरे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजीराव काळे, पोलीस पाटील लवकुश अवनुरे उपस्थित होते. प्रारंभी सकाळी प्रभात फेरी काढून घोषणा देऊन जनजागृती केली.

बालाजी पांपटवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर पहिल्या वर्गातील नवागताचे औक्षण करून फुलांचा पुष्पवृष्टी व पुष्प देऊन उपस्थित मान्यवरांनी स्वागत केले. पहिल्या दिवशीच शाळेत वृक्षारोपण यासह गणवेश व विद्यार्थ्यांसाठी पुस्तके वाटप करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांसोबत आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सेल्फी काढली. तर नव्याने मान्यता मिळालेल्या नववी वर्गाचे उद्घाटनही आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी करून विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील मुख्याध्यापक अंगद जाधव, राठोड, देवकते, रूद्रावार, डोंगळीकर, स्वामी, मामीडवार, सौ. श्रीनिवार, सौ. कांबळे, सौ. सवने, सौ. मैलापुरे, सौ. देशमुख, सौ. ईपर, सौ. भुरे, सौ. दिक्षीत, सौ. जोशी, सौ. लाभशेटवार, सौ. पुराणिक यांनी सहकार्य केले.

# युवक काँग्रेसचा खड्डे मुक्तीसाठी बेशरमाची झाडे लावून निषेध

**मुदखेड (प्रतिनिधी)-** दरेगाव ते डोंनगाव या रस्त्यावर जागोजागी जीवघेणे खड्डे पडले आहेत. या खड्डयांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे यांच्या नेतृत्वाखाली युवक काँग्रेसने खड्ड्यांत बेशरमाचे झाडे लावली.

मुदखेड ते टाकळी या २१ किलोमीटर अंतराच्या रस्त्यावर गावांसाठी परिवहन महामंडळाची तीन वेळा बस धावते. परंतु या रस्त्यावर जागोजागी जीवघेणे खड्डे पडल्यामुळे वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. या रस्त्यावरील गावातील नागरिक, शालेय विद्यार्थी, म हिला, रुग्ण यांना तालुक्याच्या ठिकाणी दररोज ये-जा करण्यासाठी हा एकमेव पर्यायी रस्ता आहे.



युवक काँग्रेसच्या वतीने सोमवार दि. १६ जून रोजी खड्डे मुक्तीसाठी जनआंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. या अनुषंगाने दरेगाव ते डोंनगाव रस्त्यावर संतप्त ग्रामस्थांकडून खड्ड्यांत बेशरमाची झाडे लावून आंदोलन करण्यात आले.

युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे, काँग्रेस तालुका अध्यक्ष प्रताप देशमुख, युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष प्रशांत पाटील मुंगल यांनी खड्ड्यांत बेशरमाची झाडे लावून शासनाच्या विरोधात घोषणा देत निषेध नोंदवला आहे.

यावेळी श्याम पाटील शिंदे, केशव पाटील शिंदे, माणिकराव मुंगल, संभाजी गाढे, अनिल कुरे, चक्रधर कुरे, रामदास शिंदे, साटवाजी शिंदे, बापूजी गाढे, दामोदर गाढे, करण गाढे, भगवान गाढे, अंताजी पाटील वाहिंदे, सतीश राहेरे, कृष्णा राहेरे, गणपती शिंदे, शहाजी गाढे, अक्षय गाढे उपस्थित होते.

# एसबीआय बँकेच्या स्थापना दिनानिमित्त रक्तदान शिबिर

**शंकरनगर (प्रतिनिधी)-** एसबीआय बँकेच्या ७० व्या स्थापना दिनानिमित्त शंकरनगर येथील स्टेट बँक ऑफ रामतीर्थ येथे मंगळवारी (दि. १७ जून) सकाळी ९.३० ते ३ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

परिसरातील जनतेने जास्तीत जास्त रक्तदान शिबिरात रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान द्यावे, असे आवाहन एसबीआय बँकेचे शाखा अधिकारी यांनी केले आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या रक्तदात्यांना प्रशस्ती प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

# अवैध वाळू उपसा करणारे बोटींग व इंजिन जिलेटिनच्या सहाय्याने उद्धवस्त

**मुदखेड (प्रतिनिधी)-** तालुक्यातील गोदावरी नदीच्या पात्रात मुगट जवळ माता साहेब येथे गोदावरी नदीपात्रामध्ये वाळूचा अवैध मार्गाने उपसा होत आहे. याची माहिती मिळताच तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी रविवारी दि. १५ जून रोजी पहाटे गोदावरी नदीपात्रात जाऊन कारवाई केली. या कारवाईत एक फायबर बोटिंग व विद्युत इंजिन पकडून जिलेटिनच्या साह्याने नष्ट केले.

तहसीलदार आनंद देऊळगावकर व पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार मारोतराव जगताप, मंडळ अधिकारी तोटावर, तलाठी बाबुराव मुळे व महसूल कर्मचारी व पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने ही धडक कारवाई केली. गोदावरी नदीपात्रात अवैध मार्गाने वाळू उपसा होत असेल तर पुढेही कडक कारवाई केली जाईल असा कडक इशारा मुदखेड तहसील कार्यालयातून देण्यात आला आहे.

# निवडक २० पोलीस अंमलदारांची स्थानिक गुन्हे शाखेसाठी निवड

**नांदेड (प्रतिनिधी)-** सर्व सोपस्कारानंतर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हा शाखेत २० नवे शिलेदार नेमले आहेत. यासोबतच बॉम्बशोधक व नाशक पथकातही तीन कर्मचाऱ्यांना संधी देण्यात आली आहे.

स्थानिक गुन्हा शाखेतील कर्मचाऱ्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या बदल्या केल्या आहेत. या ठिकाणी नव्या कर्मचाऱ्यांची निवड कशी होईल याकडेही लक्ष लागले होते. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हा शाखेत नियुक्ती पाहिजे असेल तर ही नियुक्ती गुणवत्ता आणि कामगिरीच्या आधारावरच केली जाईल, असे स्पष्ट केले. इतकेच नव्हे तर यासाठी परीक्षाही घेण्यात आल्या. या परीक्षेचा निकाल आता पुढे आला असून स्थानिक गुन्हा शाखेत वीस कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

यामध्ये नांदेड ग्रामीण ठाण्यात कार्यरत असलेले श्रीराम दासरे, संघरत्न गायकवाड, माधव म ाने, ज्ञानेश्वर कलंदर, सुनीलदत्त गटलेवार, वजिराबाद ठाण्यातील कार्यरत इमरान शेख, मनोज राठोड, पोलीस मुख्यालयातील अनिल बिरादार, रितेश कुलथे, गोविंद येईलवाड, आबाराव पिंगलवाड, म ुदखेड ठाण्यातील विनायक मठपती, जिल्हा विशेष शाखेतील दिलापकुम ार चंचलवार, भोकर ठाण्यातील प्रमोद जोंधळे आणि कुंडलवाडी ठाण्यातील संजय चापलवार यांचा समावेश आहे. स्थानिक गुन्हा शाखेत नव्याने नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये सर्वाधिक पाच कर्मचारी हे नांदेड ग्रामीण ठाण्यातील आहेत तर पोलीस मुख्यालयातील चार, इतवारा ठाण्यातील तीन आणि वजिराबाद ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांचा या नियुक्तीमध्ये सम ावेश आहे. याच नियुक्ती आदेशात पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी बॉम्बशोधक व नाशक पथकातही तीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यामध्ये रवींद्र राठोड, सचिन घोगरे आणि अनिल कोलते या तीन कर्मचाऱ्यांचा सम ावेश आहे.

स्थानिक गुन्हा शाखा आणि अवैध धंदे यांचा नेहमीच या न त्या माध्यमातून संबंध जोडला जातो. त्यात स्थानिक गुन्हा शाखेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या नेमणूका या नेहम ीच चर्चेत असतात. नांदेड जिल्हा स्थानिक गुन्हा शाखेने चांगले काम तत्कालीन पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी केले होते. त्यांच्या पूर्वीच्या नियुक्त्या अगदी राज्यस्तरापर्यंत गाजल्या होत्या.

# सुंदरबाई शिंदे यांचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी)-** सोनारी येथील सुंदरबाई दत्तराव शिंदे ( वय ७०) ह.मु.बालाजीनगर (तरोडा बु.) नांदेड यांचे दि.१६ रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे. दाभड ता.अर्धापूर येथील बालाजीराव संभाजीराव टेकाळे यांच्या त्या सासू होत.



# शिवसेनेचे जिल्हा संघटकपदी नवनाथ काकडे यांची नियुक्ती




**नांदेड (प्रतिनिधी)-** शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे सक्रिय कार्यकर्ते नवनाथ काकडे यांची शिवसेना जिल्हा संघटक पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. नांदेड जिल्हाप्रमुख व आमदार बालाजी कल्याणकर यांच्या हस्ते काकडे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, तालुकाप्रमुख धनंजय पावडे, तालुकाप्रमुख गणेश बोकारे, ओबीसी तालुकाप्रमुख जनकवाडे आणि राजु वाघमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते. नवनाथ काकडे यांची ही निवड पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वाची ठरेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

# मजुरीचे पैसे मागितल्यावरून कामगारावर हल्ला

**किनवट (प्रतिनिधी)-** मजुरीचे पैसे मागितल्याच्या कारणावरून एका मजुरावर धारदार शस्त्राने हल्ला करून त्यास गंभीर जखमी केल्याची घटना तालुक्यातील दुधगाव (प्रधानसांगवी) येथे रविवारी घडली.

दुधगाव येथील संतोष दिगांबर घुगे हा प्रधानसांगवी येथील विष्णुकांत नामदेवराव मुंडे याच्याकडे रविवारी रात्री मजुरीचे पैसे मागण्यासाठी गेला होता. तुझे काय पैसे बुडवून टाकतो का, असे म्हणत संतोष घुगे याला शिवीगाळ करीत धारधार शस्त्राने त्याच्या उजव्या व डाव्या दंडावर व इतर ठिकाणी वार करून गंभीर स्वरूपाच्या जखमा केल्या. याप्रकरणी आरोपीविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# स्वच्छता तेथे आरोग्याची धनसंपदा -राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**नांदेड (प्रतिनिधी)-** स्वच्छतेतून आरोग्य आणि आरोग्यातून समृध्दी, असा संदेश संत गाडगेबाबांनी दिला आहे. जिथे स्वच्छता असते तिथे सुख-शांती असते. ज्या घरात स्वच्छता असते तेथे आरोग्याची धनसंपदा असते. म्हणून स्वच्छतेला महत्त्व असून ते प्रत्येक नागरिकापर्यंत पोहचविणे गरजेचे असल्याचे मत राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.



सोमवारी राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर ह्या माहूर येथे दर्शनाच्या व आनंद दत्तधाम आश्रम भेटीच्या निमित्ताने नियोजित दौऱ्यावर आल्या होत्या. यावेळी त्यांनी प्रथम माहूर गडावरील भगवान दत्त प्रभू, माता रेणुकेचे दर्शन घेऊन आरती केली. त्यानंतर साईनाथ महाराज वसमतकर यांच्या आनंद दत्तधाम आश्रमास भेट देऊन आशीर्वाद घेतले. यावेळी आश्रमाच्यावतीने त्यांचा यथोचित सत्कार सन्मान करण्यात आला.

यावेळी भक्तांना संबोधित करताना राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, मुघलांनी उद्ध्वस्त केलेल्या मंदिराची उभारणी करण्याचे काम ३०० वर्षापूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी केले. त्यांच्याच विचारांचा वारसा पुढे नेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रभू रामचंद्राचे मंदिर अयोध्येत उभा केले. काशी कॉरिडॉर उभारले, उज्जैन मंदिराचा विकास केला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनीही तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा म्हणून भरभरून निधीची घोषणा केली आहे. त्यात श्रीक्षेत्र माहुरचा देखील समावेश आहे. प्रत्येक तीर्थक्षेत्र दर्जेदार व्हायला पाहिजे. त्या ठिकाणावरून आपणास ऊर्जा मिळते. त्यासाठी आमचे राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

साईनाथ महाराज वसमतकर यांनी माहूर या संत भूमीचे महत्व सांगून राज्य सरकारचा स्वच्छता दूत म्हणून शेवट पर्यंत देशसेवा करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. यावेळी खासदार नागेश पाटील आष्टीकर, शिवसेना जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे, माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी, भाजपचे तालुकाध्यक्ष निळखंट मस्के, संध्या प्रफुल राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. सुत्रसंचालन एस. एस. पाटील यांनी तर आभार भाऊ पाटील यांनी मानले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com